# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२०८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.१४ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## ऐन सणासुदीच्या काळात खाद्यतेल महागणार आयात शुल्कात २० टक्क्यांची वाढ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४नवी दिल्ली**

गणेश उत्सव सध्या जोशात सुरु आहे, तर त्यानंतर पितृ पंधरवडा लागेल, तो संपला की नवरात्र उत्सव सुरु होईल आणि त्यानंतर दिवाळी. ऐन सणासुदीच्या काळात खाद्य तेल महागणार आहे. त्यामुळे आता सामान्य माणसाचं महिन्याचं बजेट कोलमडणार हे निश्चित झालं आहे.

नवरात्रात नऊ दिवसांचे उपास असतात, दिवाळीत फराळ तयार केला जातो. या सगळ्यासाठी खाद्य तेल वापरलं जातं. ऐन सणासुदीच्या काळात खाद्य तेलांच्या किंमती वाढल्याने ग्राहकांच्या खिशाला कात्री लागणार आहे तर गृहिणींचं महिन्याचं बजेट कोलमडणार आहे हे निश्चित. पीटीआयच्या वृत्तानुसार सरकारने क्रूड, रिफाईंड सनफ्लॉवर ऑईल आणि अन्य खाद्य तेलांवरील कस्टम ड्युटी वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. आयात शुल्कात २० टक्के वाढ करण्यात आल्याने खाद्य तेल महागणार आहे. ऐन सणासुदीत ही दरवाढ झाल्याने आता बजेट कसं मांडायचं हा प्रश्न सगळ्यांनाच सतावणार आहे.

## उद्घाटनाआधीच वंदे भारत एक्स्प्रेसवर दगडफेक अनेक डब्यांचं नुकसान, पाच अटकेत

### छत्तीसगडमधील महासमुंद जिल्ह्यामधील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ महासमुंद छत्तीसगड**

छत्तीसगडमधील महासमुंद जिल्ह्यामध्ये वंदे भारत एक्स्प्रेसवर दगडफेक करण्यात आल्याची घटना घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार बागबाहरा रेल्वेस्टेशन जवळ वंदे भारत एक्स्प्रेसवर दगडफेक करण्यात आली. या घटनेत ट्रेनच्या तीन डब्यांचं नुकसान झालं. या ट्रेनची शुक्रवारी रायपूर ते विशाखापट्टणम दरम्यान चाचणी घेण्यात आली होती. दरम्यान, विशाखापट्टणम येथून परतताना या ट्रेनवर दगडफेक करण्यात आली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी हे १५ सप्टेंबर रोजी हिरवा झेंडा दाखवून या ट्रेनला रवाना करणार आहेत. दरम्यान, उद्घाटनापूर्वीच या ट्रेनवर दगडफेक झाल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी तपास करत आरपीएफने ५ आरोपींना अटक केली आहे. याबाबत अधिक माहिती देताना पोलिसांनी सांगितले की, शुक्रवारी रायपूर विशाखापट्टणम वंदे भारत एक्स्प्रेसची ट्रायल रन घेण्यात आली ही ट्रेन सकाळी ७ वाजता रवाना झाली. सकाळी नऊ वाजता ही गाडी बागबाहराजवळ पोहोचली असताना काही समाजकंटकांनी धावत्या ट्रेनवर दगडफेक केली. पोलिसांनी या प्रकरणी आरोपीचा शोध घेत पाच जणांना अटक केली आहे. सर्व आरोपी समाजकंटक असून ते बागबाहरा येथीलच रहिवासी असल्याची माहिती समोर आली आहे.

## धनगर आरक्षणाच्या आंदोलनावेळी भाषण करताना सरपंचाने विष प्यायले; आंदोलकांची धावपळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४पंढरपूर**

धनगर उपोषणाला पाठिंबा देण्याचे भाषण करत असताना आलेगाव येथील सरपंच अमोल देवकाते यांनी विषारी औषध घेत केला आत्महत्येचा प्रयत्न केला, यामुळे आंदोलनस्थळी मोठी धावपळ उडाली.



धनगर समाजातील अमोल देवकते या कार्यकर्त्याने उपोषण स्थळी विषारी औषध प्राशन केले. देवकाते यांना तात्काळ रुग्णालयात हलविण्यात आले. त्यांची प्रकृती बिघडली असून उपचार सुरु करण्यात आले आहेत.

धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी या मागणीसाठी पंढरपूरमध्ये हे आंदोलन सुरु आहे. या उपोषणस्थळी भाजप विधान परिषद आमदार गोपीचंद पडळकर यांनी भेट दिली.आरक्षणाच्या मागणीवर निश्चितपणे काहीतरी तोडगा निघेल. चारही बाजूने आमच्या समाजाच्या लोकांचा प्रयत्न सुरू आहे. कार्यकर्ते, नेते मंडळी ताकदीने प्रयत्न करत आहेत. सरकार आम्हाला सकारात्मक प्रतिसाद देत आहे. त्यांनी निर्णयापर्यंत यावे, हीच आमची अपेक्षा आहे, असे पडळकर म्हणाले.

## राज्य सरकार लवकरच हैदराबाद गॅझेटियर मराठा आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ मुंबई**

महाराष्ट्रात मागील वर्षभरापासून मराठा आरक्षणाचा प्रश्न धुमसत आहे. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावं, या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील हे सातत्याने उपोषण आणि आंदोलन करत सरकारची कोंडी करत आहेत. आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी घेतलेल्या सरकारविरोधी भूमिकेचा नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत सत्ताधारी महायुतीला मोठा फटका बसला.



मराठवाड्यातील आठ पैकी केवळ एका जागेवर महायुतीचा उमेदवार विजयी झाला. या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीतही आरक्षण प्रश्नाचा फटका बसू नये, यासाठी सरकार दरबारी हालचाली सुरू झाल्या असून राज्य सरकार लवकरच हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेण्याची शक्यता आहे.

मराठा समाज हा मूळ कुणबी असल्याने आम्हाला कुणबी दाखले देऊन ओबीसीमध्ये समावेश करावा, अशी मनोज जरांगे यांची मूळ मागणी आहे. या मागणीला आधार म्हणून जरांगे पाटील हे सातत्याने हैदराबाद गॅझेटियरचा उल्लेख करत असतात. हैदराबाद गॅझेटियरमध्ये मराठा आणि कुणबी एकच असल्याचा दावा जरांगे यांच्याकडून केला जातो. या पार्श्वभूमीवर सदर गॅझेटियरच्या आधारे मराठवाड्यातील मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात यावे, अशी त्यांची मागणी आहे. राज्य सरकारकडून आता ही मागणी मान्य करत विधानसभा निवडणुकीपूर्वी आरक्षण प्रश्न निकाली काढण्याचा प्रयत्न होऊ शकतो. याबाबत 'एबीपी माझा'ने वृत्त दिलं आहे.

दरम्यान, हैदराबाद गॅझेटियरबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे २५ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर यादरम्यान एक दिवसीय विशेष अधिवेशनही बोलवण्याची विनंती राज्यपालांना करू शकतात. सरकारकडून असा निर्णय घेतला गेल्यास विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघणार आहे.

## खासगी अन् सरकारी शाळांमध्ये मराठी शिकणं अनिवार्य; शिंदे सरकारानं काढला जी.आर.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

राज्यातल्या सर्व खासगी आणि सरकारी शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा करण्यात आला आहे. अध्ययन आणि अध्यापन सक्तीचे करण्याबाबतचा शासन निर्णयही जारी करण्यात आला आहे. एवढेच नव्हे तर, परीक्षेचा निकालही ग्रेड ऐवजी मार्क देऊन लावला जाणार आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सर्व माध्यमातील शाळांमध्ये मराठी विषयाची परीक्षा घेऊन श्रेणी स्वरूपात मूल्यांकन न करता मार्क्स देऊन मराठी भाषेच्या परीक्षेचे मूल्यांकन केले जाणार आहे.



मराठी भाषेचे श्रेणी स्वरूपात मूल्यांकन होत असताना इतर माध्यमातील शाळांमध्ये मराठी भाषा विषय गांभीर्याने शिकवलं जात नसल्याचे निदर्शनास आल्यानंतर राज्य सरकारकडून खासगी आणि सरकारी शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्ययन आणि अध्यापन सक्तीचे करण्याबाबतचा शाशन निर्णय जारी करण्यात आला आहे.

१ एप्रिल २०२० रोजी शिक्षण विभागाकडून मराठी भाषा सर्व माध्यमातील शाळांमध्ये सक्तीची करण्यासंदर्भात शासन निर्णय जारी करण्यात आला होता. २०२०-२१ पासून राज्यभरातील शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने मराठी भाषा विषय सक्तीचा करण्यासंदर्भात पाऊल टाकण्यात येत आहेत.२०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सर्व माध्यमातील शाळांमध्ये मराठी विषयाची परीक्षा घेऊन मार्क्स देऊन मराठी भाषेच्या परीक्षेचे मूल्यांकन केले जाणार आहे.

## भाजप अध्यक्ष जे पी नड्डांनी घेतले मुख्यमंत्र्यांच्या बाप्पांचे दर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय स्वास्थ्य आणि परिवार कल्याण मंत्री जे पी नड्डा आणि केंद्रीय पर्यावरण, वन, जलवायू परिवर्तन मंत्री भुपेंद्र यादव यांनी आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा निवासस्थानी जाऊन श्री गणेशाचे दर्शन घेतले, यावेळी माझे सुपुत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी स्वागत करून शाल, पुष्पगुच्छ आणि श्री गणेशाची मूर्ती देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल, खासदार मिलिंद देवरा,



कौशल्यविकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार आशिष शेलार,आमदार प्रवीण दरेकर, शिवसेना भाजप समन्वयक आशिष कुलकर्णी आदी मान्यवर देखील उपस्थित होते.

## बांगलादेशातील राजकीय अस्थिरतेचा नगरला फटका! तब्बल १८० कोटींची दुधाची भुकटी पडून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अहमदनगर**

दूध उत्पादनात अग्रेसर असलेल्या अहमदनगर (जिल्ह्यात दूध भुकटी निर्मिती करणारे आठ कारखाने आहेत. बांगलादेशातील राजकीय अस्थिरतेचा परिणाम या दूध भुकटी निर्मिती करणाऱ्या उद्योगांवरही झाल्याचे दिसून येत आहे. दोन महिन्यापासून जिल्ह्यात १८० कोटी रुपयांची ९ हजार मॅट्रिक टन दूध भुकटी या कारखान्यांत



पडूनच आहे.

भुकटी निर्मिती करणाऱ्या कारखान्यामध्ये एक किलो दूध बुकटी निर्मितीसाठी २४० रुपये खर्च येतो. प्रत्यक्षात मात्र सध्या किलोमागे २०५ रुपये भाव मिळत असल्याने दूध भुकटी निर्मिती करणारे उद्योग अडचणीत आले आहेत. भारताच्या तुलनेत न्यूझीलंड या देशातील दूध भुकटी उच्च दर्जाची आणि कमी दराने मिळत असल्यामुळे सध्या आंतरराष्ट्रीय बाजारातून या देशातील भुकटीला सर्वाधिक मागणी आहे.

**९ हजार टन दुधाच्या भुकटीची निर्यात थांबली**

दुबई, शारदा, कुवेत सौदी अरब यासह बांगलादेश आणि अन्य देशात भारतातून दूध भुकटी, बटर आणि दुधापासून तयार केलेल्या अन्नपदार्थांची निर्यात केली जाते. बांगलादेशात गेल्या काही दिवसापासून राजकीय अस्थिरता निर्माण झाली आहे. त्याचा फटका दूधापासून निर्मित केलेल्या अन्नपदार्थांनाही बसला आहे. राजकीय अस्थिरतेमुळे दीड महिन्यापासून ९ हजार टन दुधाच्या भुकटीची निर्यात थांबली आहे.

## आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताने पाकिस्तानचा २-१ ने उडविला धुव्वा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ बीजिंग**

आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारतीय संघाने पाकिस्तानचा २-१ ने पराभव करत सलग पाचव्या विजयाची नोंद केली आहे. या सामन्यात भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंगने दोन गोल केले तर पाकिस्तानकडून अहमद नदीमने गोल केला.



या सामन्याच्या पहिल्या क्वार्टरमध्ये भारतीय संघाने आक्रमक सुरुवात केली होती मात्र पाकिस्तानकडून अहमद नदीमने ०७ व्या मिनिटाला फिल्ड गोल करत पाकिस्तानला आघाडी मिळवून दिली. त्यानंतर भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंगने १२व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरच्या मदतीने गोल करून या सामन्यात बरोबरीत आणले. दुसऱ्या क्वार्टरमध्ये पुन्हा एकदा भारतीय संघाने आक्रमक सुरुवात करत २-१ अशी आघाडी घेतली.

दुसऱ्या क्वार्टरमध्ये देखील भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंगने गोल केला यानंतर पाकिस्तानला देखील एक पेनल्टी कॉर्नर मिळाला पण पाकिस्तानला याचा फायदा घेता आला नाही. तर तिसऱ्या क्वार्टरमध्ये दोन्ही संघांनी दमदार खेळाचे प्रदर्शन केले. भारतीय संघाला आणि पाकिस्तानला पेनल्टी कॉर्नर मिळाला होता मात्र दोन्ही संघाला फायदा मिळाला नाही.भारताने या स्पर्धेत सलग पाचवा सामना जिंकला आहे. भारताने चीनचा ३-०, जपानचा ५-१, मलेशियाचा ८-१ आणि कोरियाचा ३-१ असा पराभव केला आहे.

## नाथाभाऊंबाबत केंद्रीय नेतृत्वाचे म्हणणे मान्य, गणपतीनंतर योग्य निर्णय घेतला जाईल: फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मुंबई**

लोकसभा निवडणुकीपासून एकनाथ खडसे यांच्या भाजपा प्रवेशाची चर्चा आहे. केंद्रातील पक्षश्रेष्ठींच्या उपस्थितीत भाजपा प्रवेश झाला असल्याचे एकनाथ खडसे यांनी म्हटले आहे. तसेच राज्यातील काही भाजपा नेत्यांमुळे तो जाहीर करत नसल्याचा दावाही एकनाथ खडसे यांनी केला आहे. यातच एकनाथ खडसे यांनी आणखी एक मोठा गौप्यस्फोट केला. यावर राजकीय वर्तुळात प्रतिक्रिया उमटत आहेत.



उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबतही एक खुलासा केला. यावर देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट शब्दांत भाष्य केले.

भाजपा प्रवेश झाला आहे, परंतु, त्याची घोषणा केली जात नाही, असा एकनाथ खडसे यांचा दावा असून, याबाबत देवेंद्र फडणवीस यांना पत्रकारांनी प्रश्न विचारला. यावर बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, ते काय म्हणाले, हे मी ऐकलेले नाही. मात्र, त्यांच्या संदर्भात आमच्या केंद्रीय नेतृत्वाने निर्णय घेतलेला आहे. तो निर्णय आम्हा सर्वांना मान्यच आहे. केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा करून गणेशोत्सवानंतर यासंदर्भात योग्य निर्णय घेतला जाईल.

## संपादकीय ......

# राजकारणातील दुर्मीळ कॉम्रेड

दहा-बारा वर्षांपूर्वीची गोष्ट. सीताराम येचुरींसोबत मी जयपूरहून एका कार्यक्रमात सहभागी होऊन परतत होतो. त्यांच्या हातात एक पुस्तक होते, 'ई इज इक्वल टू एमसी स्क्वेअर.' लेखक डेव्हिड बोदानीर. मला माहीत होते की, त्यांचे वाचन विविधांगी आणि सखोल होते. म्हणून मी त्यांना या पुस्तकाबद्दल विचारू लागलो. पुस्तक चाळून, पलटून पाहिल्यावर मला ते आवडले. माझी उत्सुकता लक्षात येताच ते म्हणाले, 'तुमचा पत्ता पाठवा.' मी त्यांना माझा पत्ता दिला आणि चार दिवसांत पुस्तकाची प्रत माझ्यापर्यंत पोहोचली. लोकांशी कुशलतेने जोडले जाणे हे येचुरी यांचे सर्वांत मोठे गुणवैशिष्ट्य होते.

मी त्यावेळी खासदार नव्हतो; पण मी त्यांच्यासोबत राहिलो तेव्हा ते अगदी छोट्या गोष्टींचीही दखल घेत असत. मी राज्यसभेवर आलो त्याचदरम्यान त्यांचा कार्यकाळ संपत आला होता. त्यांनी मला निरोप पाठवला की, 'कॉम-ेड, तुम्ही राज्यसभेवर अगदी योग्य वेळी आलात, मी निघतोय आणि तुम्ही येत आहात.' राजकारणात एवढी प्रदीर्घ कारकीर्द असलेला नेता असे म्हणत आहे, ही माझ्यासाठी खूप मोठी बाब होती. कारण, माकपच्या सर्वोच्च युनिट मानल्या जाणार्‍या पॉलिट ब्युरोमध्ये येचुरी प्रदीर्घ काळ होते. त्यांना एकेकाळी राज्यसभेचे सर्वोत्तम खासदार मानले जात होते. अशा बुद्धिमान आणि अभ्यासू व्यक्तिमत्त्वाने प्रदीर्घ आजाराशी लढत असतानाच जगाचा निरोप घेतला, हे ऐकून वेदना झाल्या. प्रत्येक स्तरावर मजबूत संबंध किंवा संपर्क निर्माण करणारे कुशल राजकारणी म्हणून त्यांची ओळख होती. त्यामुळेच येचुरी यांचे लालू प्रसाद यादव यांच्याशी जे नाते होते, तेच संबंध तेजस्वी यादव यांच्याशीही होते. कष्टकरी मजुरांप्रती असलेल्या समर्पित आयुष्यातील त्यांचा संघर्ष अवघ्या देशाने पाहिला आहे.

येचुरी यांच्या जाण्याने निर्माण झालेल्या पोकळीची भरपाई कधी होईल, असे वाटत नाही. त्यांना राग अनावर झाला आहे, असे कधीच दिसले नाही. सध्याच्या विखारी काळातही येचुरी यांनी राजकारणाचे मूळ स्वरूप कायम ठेवले होते. आपण एकमेकांच्या कितीही विरोधात असलो, तरी एकाच वर्तुळात किंवा मंचावर एकमेकांसोबत असतो, हे या भारतीय स्वभावाचे मूळ तत्त्व आहे.

कॉम्रेड हरकिशन सिंग सुरजित यांच्यानंतर देशाच्या राजकारणात आलेल्या संक्रमण काळात येचुरी यांची डाव्या पक्षांमधील भूमिका खूप वाढली होती. डावे पक्ष संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारमध्ये सामील झाले, तेव्हा युती कशी करायची, कोणते मुद्दे असतील, सरकारचा 'कॉमन मिनिमम प्रोग्रॅम' कोणता असेल, याबाबतची त्यांची भूमिका सदैव स्मरणात राहील. सुरजित सिंगांनंतरच्या काळात शेतकरी, मजूर आणि उपेक्षित लोकांच्या राजकारणासाठी झटत राहणे सोपे नव्हते. कारण, बहुमताच्या वर्चस्वाचे राजकारण प्रबळ होत चालले होते. त्या काळाद येचुरी यांनी केवळ सुरजित यांचा वारसा कायम ठेवला नाही, तर डाव्या विचारसरणीची उमेद जिवंत ठेवली.

विशेषतः २०१० नंतरच्या काळात कामगार आणि उपेक्षितांचा विश्वास जपण्याचे आव्हान येचुरी यांनी समर्थपणाने पेलले होते. 'इंडिया ब्लॉक'च्या बैठकांवर नजर टाकली, तर त्यात येचुरी यांची भूमिका खूप महत्त्वाची होती. त्यांचे स्मरण करताना हे लक्षात ठेवले पाहिजे की, कोणत्याही विचारधारेचा उदय आणि अस्त ही प्रवृत्ती असते. गेल्या काही वर्षांत डाव्यांच्या प्रतिकूल काळात आपली भूमिका, विचारधारा आणि भारतभूमीच्या गरजांभोवती केंद्रित ठेवली पाहिजे, इथल्या मुद्द्यांशी आणि जडणघडणीशी नैसर्गिक संबंध असलेली विचारधाराच अंतिमतः टिकणार आहे, हे त्यांचे नेहमी सांगणे असायचे. येचुरी यांच्यात असणारी जात आणि समाजाची समज आज फार कमी लोकांमध्ये आढळते. त्यांच्यासाठी संघर्ष हा केवळ निवडणूक किंवा सत्तेचा विषय नव्हता, तर विचारधारेची लढाई होती. अशी लढाई एक-दोन निवडणुकांतील जय-पराजयाने संपत नाही. त्यामुळेच निवडणूक निकालानंतर ते नेहमी म्हणायचे, 'अरे कॉम-ेड, निवडणुकाच तर हारलोय, उमेद हारलेलो नाही. जिद्द, उमेद कायम ठेवा, निवडणुका परत येतीलच.' अशा या संघर्षशील कॉम्रेडना अखेरचा लाल सलाम!

# इंटरसिटी एक्स्प्रेस आता थेट नागपूर पर्यंत

## अजनी रेल्वे स्थानकावरील कामामुळे बदल




**विदर्भ प्रजासत्ताक**


**दि.१४अमरावती** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात अजनी स्टेशनवर सध्या सुरू असलेल्या पुनर्विकास कामासाठी विशेष ट्रॅफिक आणि पॉवर ब्लॉक घेण्यात आला आहे. अजनी स्टेशनवरील प्लॅटफॉर्म क्रमांक २ व ३ हे १२ सप्टेंबर ते १० डिसेंबर या काळात तात्पुरत्या स्वरूपात ब्लॉक करण्यात आलेत. या ब्लॉकमुळे अमरावती-नागपूर इंटरसिटी एक्सप्रेससह इतर अनेक रेल्वे गाड्या या अजनी स्टेशनऐवजी थेट नागपूर मुख्य स्टेशनपर्यंत जातील व तेथूनच सुटतील.

गाडी क्र. १२१२० अजनी-अमरावती इंटरसिटी एक्सप्रेस (दैनिक) १२ सप्टेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत नागपूरहून सायंकाळी ६.२० वाजता सुटेल. तसेच गाडी क्र. १२११९ अमरावती अजनी एक्सप्रेस (डेली) १२ सप्टेंबर ते १० डिसेंबरदरम्यान नागपूरच्या मुख्य स्टेशनवर सकाळी ८.२५ वाजता पोहोचेल. अमरावती मॉडेल रेल्वे स्टेशनवरून इंटरसिटी निर्धारित वेळेतच सुटेल. गाडी क्र. २२१२४ अजनी- पुणे एक्सप्रेस १७ सप्टेंबर ते १० डिसेंबर याकाळात नागपूर स्टेशनवरून सायंकाळी ७.४० वाजता सुटेल. गाडी क्र. २२१२३ ही १३ सप्टेंबर ते ६ डिसेंबरपर्यंत मुख्य स्टेशनवर पहाटे ५ वाजता पोहोचेल. त्याचप्रमाणे गाडी क्र. २२१४० अजनी- पुणे एक्स्प्रेस (रविवार) १५ सप्टेंबर ते ८ डिसेंबरपर्यंत नागपूर मुख्य स्टेशनवरून सायंकाळी ७.४० वाजता प्रस्थान करेल. गाडी क्र. र२१३९ पुणे-अजनी एक्सप्रेस (रविवार) १४ सप्टेंबर ते ७ डिसेंबर या काळात नागपुर स्टेशनवर दुपारी १ वाजता पोहोचेल. या सर्वच रेल्वे गाड्या अमरावती, बडनेरा येथील प्रवाशांसाठी महत्त्वाच्या असून, येथील बहुतेकप्रवासी याच रेल्वेद्वारे नागपूर, अमरावती, बडनेरा, पुणे, मुंबई, कोल्हापूरकडे प्रवास करत असतात. प्रवाशांनी या बदलांची नोंद घ्यावी. सर्व नागपूर मुख्य रेल्वे स्टेशनवरून सुटतील किंवा थांबतील. झालेल्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत आणि अजनी स्टेशनच्या पायाभूत सुविधा वाढवण्याचे काम करत असताना भविष्यात चांगल्या सुविधा, कनेक्टिव्हिटी प्रदान करण्यासाठी या सुधारणा महत्त्वपूर्ण असल्याचे मध्य रेल्वेद्वारे कळवण्यात आले आहे.

### अजनी स्टेशनवरील या मुख्य गाड्यांचे थांबे तात्पुरते रद्द

अजनी स्टेशनवरील ७ एक्सप्रेसचे थांबे हे तात्पुरते रद्द करण्यात आलेत. यात गाडी क्र. ११०३० महाराष्ट्र एक्स्प्रेस (दैनिक), गाडी क्र. ११४०३ नागपूर-कोल्हापूर एक्सप्रेस (मंगळवार, शनिवार), गाडी क्र. १२१०६ गोंदियासीएसएमटी विदर्भ एक्सप्रेस (दैनिक), गाडी क्र. १२१३६ नागपूर - पुणे एक्स्प्रेस (सोमवार, बुधवार, शनिवार), गाडी क्र. १२११४ नागपूर - पुणे गरीब रथ एक्स्प्रेस (मंगळवार, शुक्रवार, रविवार), गाडी क्र. १२१४० नागपूर - - सीएसएमटी सेवाग्राम एक्स्प्रेस (दैनिक) व गाडी क्र. १८०३० शालीमार - - एलटीटी एक्स्प्रेस (दैनिक) यागाड्यांचा समावेश आहे.

# सोयाबीन, तूर, मका पिकांवर या किडींचा धोका त्यांना वेळीच रोका



खरीपातील किडींचे नियंत्रण

**विदर्भ प्रजासत्ताक**

राज्यात खरीप हंगामात घेतल्या जाणाऱ्या पिकावर प्रमुख किडी व रोगांचा प्रादुर्भाव कमी करण्याच्या अनुषंगाने व्यवस्थापनेच्या उपाययोजना शेतकऱ्यांनी केल्यास त्यांना निश्चित फायदा होणार आहे.

**तूर**- तूर पिकावर खोड माशीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ५ टक्के निंबोळी अर्क किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १५ मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

- तूर पिकात शेंगा पोखरणारी अळीच्या प्रादुर्भावाचा आगाऊ अंदाज समजण्यासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे ५० मीटर अंतरावर शेतात उभारावेत.

**सोयबीन**- सोयाबीन पिकात स्पोडोप्टेरा अळीच्या उपद्रवाचा आगाऊ अंदाज घेऊन नुकसान टाळण्यासाठी हेक्टरी ५ स्पोडोलूरचा वापर करण्यात आलेले फेरोमेन सापळे नियंत्रणासाठी वापरावेत.

**मका**- मका पिकावर अमेरिकन लष्करी अळीच्या १० टक्के पेक्षा जास्त प्रादुर्भाव आढळून आल्यास नियंत्रणासाठी क्लोरानट्रानीलीप्रोल १८.५ टक्के एस. सी ०.४ मिली प्रती लीटर पाणी किंवा

- स्पीनोटोराम ११.७ टक्के एस. सी ०.५ मिली प्रती लीटर पाणी किंवा

- इमामेक्टिन बेन्झोएट ५ टक्के एस. जी ०.४ ग्राम प्रती लीटर पाणी वापरून फवारणी करावी.

**भुईमुग** - भुईमुग पिकावरील रस शोषण करणाऱ्या किडींच्या फ्लुबेन्डामाइड नियंत्रणासाठी ३.५ टक्के हेक्साकोनॅझोल ५ टक्के डब्ल्यूजी २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**भात**- भात पिकावर काही ठिकाणी तपकिरी तुडतुडे आणि हिरवे तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

- प्रादुर्भाव दिसून येताच फिप्रोनिल ५ टक्के एस. सी. २० मि. ली. प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी पावसाची उघडीप पाहून करावी.- शेतकरी बांधवांनी अळ्या खाणाऱ्या शिकारी पक्ष्यांना थांबण्यासाठी सोयाबीन शेतात विविध ठिकाणी 'टी' आकाराचे पक्षी थांबे उभारावेत.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष




## वरण-भातावर 'हा' पदार्थ घालून खा; रोजचं साधं वरण होईल अमृतासमान, थकवा-कमजोरी होईल दूर

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक**

हेच तुमचं फेव्हरेट अन्न असेल. प्रत्येक घरात वरण बनवण्याची पद्धत वेगवेगळी असते. काही लोक सांबारमध्ये भरपूर भाज्या घालून डाळ शिजवतात तर काहीजण फक्त तूप आणि जीऱ्याची फोडणी देऊन डाळ शिजवतात. काहींना फोडणी देऊन वरण-भात खायला आवडतो. डाळ आपल्या आहाराचा एक महत्वपूर्ण भाग आहे.डाळ प्रोटीनचा सर्वात चांगला स्त्रोत आहे. डाळीत भरभरून न्युट्रिशन्स असतात. वेट लॉस एक्सपर्ट सकिना मुस्तान सिर सांगतात की डाळ आयर्नचा सर्वात चांगला स्त्रोत आहे. डाळ खाल्ल्यानं शरीरातील आयर्न शोषण्यास मदत होते. साधी मीठ घालून केलेली डाळ अधिकच टेस्टी बनते.

डाळ शिजवण्याआधी भिजवून ठेवल्यास पचनक्रिया चांगली राहते आणि न्युट्रिशनचे शोषण चांगले राहते. डाळी भिजवल्यानं त्यातली फायटीक एसिड आणि टेनिन्स काढून टाकले जाते. ज्यामुळे गॅस, ब्लॉटींग उद्भवू शकते. जास्तीत जास्त आरोग्यदायी फायदे मिळवण्यासाठी डाळी शिजवण्याआधी भिजवलेलं चांगलं ठरतं.

**डाळीच्या सेवनानं आयर्नची कमतरता दूर होते**- डाळ प्लांट बेस्ड आयर्नचा एक चांगला स्त्रोत आहे. जे एक आवश्यक मिनरल आहे. याच्या सेवनानं शरीरात एनिमियाची स्थिती उद्भवत नाही आणि शरीरात एनर्जी लेव्हल टिकून राहते. लाईफस्टाईल फाऊंडर डॉ. रोहिणी पाटील यांनी सांगितले की डाळीसोबत प्लांट बेस्ड स्त्रोतांमध्ये आढळणाऱ्या आयर्नच्या स्त्रोतांना नॉन हिम आयर्नच्या रूपाने ओळखले जाते.




**डाळीला पॉवरफूल बनवण्यासाठी त्यात लिंबू मिसळा**- व्हिटामीन सी नॉन हिम आयर्नच्या अवशोषणाला प्रोत्साहन देण्यास मदत करतात. ज्यामुळे डाळीतील आयर्नची उपलब्धता वाढते. तुम्ही डाळीत लिंबू घालून शरीराला आवश्यक असलेल्या मिनरल्सची कमतरता भरून काढू शकता. **डाळीत लिंबू पिळून खाण्याचे फायदे**- लिंबू पिळून खाल्ल्याने पोषणाव्यतिरिक्त पचनक्रिया चांगली राहण्यास मदत होते. लिंबू घातल्याने लहान मुलांनाही डाळीची चव आवडेल. याव्यतिरिक्त डाळीचा आंबटपणा डाळीत मिसळल्या जाणाऱ्या मसाल्यांमध्ये एकत्र होतो. त्यामुळे वरणाला चांगली चव लागते.

# साऊंड सिस्टीमच्या दणदणाटामुळे हार्टअॅटॅकचा धोका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अमरावती**

कानठळ्या गच्च करणारा साऊंड सिस्टीमचा दणदणाट तुम्हाला हृदयविकाराचा झटका व कायमचा बहिरेपणा देऊन जाऊ शकतो. यामुळे गणेश विसर्जन मिरवणुकीत बेभान होऊन साऊंड सिस्टीमच्या दणदणाटात नाचताना अचानक छातीत धडधडणे, चक्कर येणे, डोळ्यासमोर अंधारी येऊन श्वास फुलल्यास सावध व्हा, असा सल्ला वैद्यकीय तज्ज्ञांनी दिला आहे. कारण, धक्कादायक बाब म्हणजे गेल्या दोन वर्षांत विसर्जन मिरवणुकांमध्ये ध्वनी प्रदूषणाने कमाल मर्यादा ओलांडली असून, आवाजाची पातळी तब्बल १००.७ डेसिबलपर्यंत गेल्याचे एमपीसीबीच्या अहवालातून समोर आले आहे. इतक्या आवाजाच्या पातळीत काहीकाळ वावरल्यास कायमचा बहिरेपणा येण्याचा धोका असतो.

गणेश विसर्जन मिरवणुकांमध्ये साऊंड सिस्टीमच्या मोठमोठ्या भिंती उभा करून कानठळ्या गच्च करणार्‍या आवाजावर थिरकण्याची क्रेझ सध्या तरुणाईत आहे. यामुळे आवाजाच्या मर्यादेची इर्ष्या सुरू झाली आहे. परिणामी, कमाल मर्यादेच्यावर आवाज सोडण्याचे प्रकार सुरू झाले आहेत. साऊंड सिस्टीमच्या दणदणाटामुळे आवाजाची उच्च क्षमतेची कंपने निर्माण होतात. त्यामुळे हृदयावर ताण येतो. छातीची धडधड वाढते. गर्दीत श्वास घ्यायला त्रास होतो. त्यामुळे हृदयविकाराच्या गंभीर समस्यांना सामोरे जावे लागू शकते. यामुळे हृदयविकाराचा त्रास, उच्च रक्तदाबाचा त्रास असणार्‍या रुग्णांनी साऊंड सिस्टीम पासून थोडे दूर थांबलेलेच बरे, असे वैद्यकीय तज्ज्ञ सांगतात.



साऊंड सिस्टीमच्या पुढे नाचताना तसेच साऊंड सिस्टीमसमोरून दूर गेल्यानंतर काही काळाने कान गच्च होणे, कानातून आवाज येणे, चक्कर येणे, डोळ्यासमोर अंधारी येणे अशी लक्षणे दिसू लागल्यास त्वरित वैद्यकीय तज्ज्ञांचा सल्ला घ्या.

# प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटच्या विद्यार्थ्यांचे करिअर कट्टा स्पर्धेत सुयश

## माहितीपट स्पर्धेत विभागात प्रथम

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अमरावती**- विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग अॅन्ड मॅनेजमेंट, बडनेरा-अमरावती येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अॅड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, कार्यकारिणी सदस्य नितीन हिवसे,डॉ. पूनमताई चौधरी,पकंज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश हरकुट यांच्या मार्गदर्शनात विविध कार्यक्रमाचे आयोजन केल्या जाते.

यावर्षी महाराष्ट्र शासनातर्फे करिअर कट्टा या उपक्रमानंतर्गत महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान साह्यता केंद्र व महाराष्ट्र तंत्रशिक्षण संचलांनालय



यांच्या संयुक्त विदमाने माहितीपट मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते,या स्पर्धेत जिल्हा व विभाग पातळीवर महाविद्यालयाच्या तृतीय वर्ष सिव्हिल इंजिनिअरिंग चा सोहन वसंत टारपे व कॉम्पुटर इजिनिअरिंग द्वितीय वर्षाचा विध्यार्थी आयुष निलेश नागदिवे यांनी बाजी मारली.

या स्पर्धेत २१० महाविद्यालयाने आपला सहभाग नोंदवला होता,.व यात शेकडो विद्यार्थी सहभागी झाले होते ,महाविद्यालयाचे करिअर कट्टा समन्वम्यक म्हणून डॉ अमित कुमार रणीत परिश्रम घेतले.

विद्यार्थ्यांच्या या यशासाठीविभागप्रमुख प्रा प्रवीण खांडवे व डॉ दिनेश हरकूट यांचे त्यांना मार्गदर्शन मिळालेया यशासाठी त्यांचे सर्वत्र कौतुक होतं आहे.

RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. १४ सप्टेंबर २०२४

शहर/ग्रामिण


## मोर्शी उपजिल्हा रूग्णालयातील रूग्णवाहिकेची तोडफोड



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ मोर्शी–** मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालय परिसरात उभी असलेली १०८ रुग्णवाहिका व खासगी वाहनाच्या काचा फोडल्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. १२ सप्टेंबरच्या रात्री ११.३० वाजता ही घटना घडली. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली असून त्या क्लिपच्या आधारे मोर्शी पोलीस अज्ञात समाजकंटकाचा शोध घेत आहे.

मोर्शी उपजिल्हा रुग्णालय येथे ८ सप्टेंबर रोजी रात्री १० वाजता स्वतःला रुग्णसेवक व रुग्णसेविका म्हणवून घेणाऱ्या सवकांनी स्वाती ठाकूर या रुग्णाला अमरावतीला रेफर केले.याबाबत वैद्यकीय अधीक्षकांसोबत

हुज्जत घालून त्यांच्यावर प्राणघातक हल्ला व जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी मोर्शी पोलिसांनी आरोपींविरुद्ध विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला होता.या घटनेच्या तब्बल चार दिवसानंतर १२ सप्टेंबरला रात्री ११.३० वाजता चारचाकी गाडीने अज्ञात समाजकंटकांनी उपजिल्हा रुग्णालय परिसरात प्रवेश केला. रुग्णालय परिसरात उभ्या १०८ रुग्णवाहिका व नम्रता बोराळे यांच्या मारुती नेक्सा वाहनावर (एमएच ३० बीएल ०११६) दगडफेक व वाहनाच्या काचा फोडल्या. विशेष म्हणजे बोराळे यांच्या खाजगी वाहनात त्यांचे पती झोपलेले होते. त्यांना गाडीवर काहीतरी पडल्याचा भास झाला. ते गाडीमधून बाहेर येताच अज्ञात समाजकंटकांनी तेथून पलायन केले. या दगडफेकीच्या प्रकरणामुळे उपजिल्हा रुग्णालयाच्या अधिकारी, कर्मचारी, दाखल रुग्णांमध्ये दहशत निर्माण झाली आहे.

## मेंढपाळ धनगरांना मिळवून देणार विविध योजनांचा लाभ

### आ. बच्चू कडू यांचा उपक्रम – उद्याला अचलपूर येथे मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती –** भटक्या जमाती व मेंढपाळ धनगर समाजासाठी राज्य सरकार मार्फत विविध योजना राबविल्या जातात .परंतु या संदर्भात योग्य माहिती नसल्यामुळे खरे व गरजू लाभार्थी योजनांपासून वंचित राहतात ,ही बाब लक्षात घेता अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष



आमदार बच्चू कडू यांनी भटक्या तसेच मेंढपाळ धनगरांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचा संकल्प केला आहे. त्या अनुषंगाने या योजनांची माहिती देण्यासाठी तसेच लाभार्थ्यांकडून अर्ज भरून घेण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उद्या दि १५ सप्टेंबर रोजी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत मील कॉलोनी अचलपूर येथील प्रहार कार्यालय येथे सकाळी ११ वाजता मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.भटक्या जमाती तसेच मेंढपाळ धनगर व तत्सम जमाती मधील गरजू लाभार्थ्यांना सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी आयोजित मेळाव्याला आमदार बच्चू कडू ,पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त संजय कावरे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी पुरुषोत्तम सोळंके आदी अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहे. या सोबतच पशु पालनामध्ये उत्कृष्ट काम करणारे पशुपालक उपस्थित राहून मार्गदर्शन करणार असल्याचे कळविण्यात आले आहे

### सर्व योजनांची अर्ज प्रक्रिया एका छताखाली

भटक्या तसेच मेंढपाळ धनगर लोकांसाठी राज्य सरकारच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळामार्फत राजे यशवंतराव होळकर महामेष योजना ,चराई अनुदान, कुक्कुट पक्षांच्या खरेदी व संगोपनासाठी अनुदान, शेळी मेंढी पालनासाठी जागा खरेदी अनुदान अशा विविध योजना राबविल्या जात असून या योजनांचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांकडून शिबिरामध्येच ऑनलाइन अर्ज भरून त्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे .सर्व योजनांची अर्ज प्रक्रिया एकाच छताखाली होणार असून या शिबिरात मेंढपाळांच्या समस्या व त्यांचे निवारण देखील आमदार बच्चू कडू व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.



### गरजू लाभार्थ्यांना लाभ मिळावा– आ. कडू

६मेंढपाळ धनगर या भटक्या जमातीच्या लोकांना विविध योजनांचा लाभ मिळवून देत त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देण्यासाठी आपण कटिबद्ध असून गरजू लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी या मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात अचलपूर, चांदूरबाजार व अंजनगाव सुर्जी तालुक्यातील लाभार्थ्यांनी उपस्थित राहून योजनांचे संपूर्ण अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन आमदार बच्चू कडू यांनी केले आहे.

## तुम्ही एसटीची तिजोरी भरा, आम्ही तुमचे खिसे भरू; एसटीची नवी योजना

### ३० दिवसांचा प्रयोग : वाहक–चालकांना प्रोत्साहन भत्ता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अमरावती**

अडथळ्यांची शर्यत पार कडून उत्पन्नाचे नवनवे मार्ग शोधणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) आपल्या उत्पन्नात भर घालण्यासाठी आता एक नवी योजना जाहिर केली आहे.

शुक्रवारी १३ सप्टेंबरला जाहिर झालेली ही योजना एसटीच्या चालक आणि वाहकांसाठी आहे, हे विशेष !

जुनाट बसेसमुळे रस्त्यात लालपरीचे कधीही रुसून बसणे, अचानक लागणाऱ्या आगी, अपघात, कर्मचाऱ्यांचे प्रश्न कामगारांच्या प्रलंबित मागण्याच्या पुर्ततेसाठी संघटनांकडून संपाचे वारंवार मिळणारे ईशारे आदी एक ना अनेक अडथळे पार करत एसटीच्या लालपरीची धावपळ सुरू आहे. तिच्या या रात्रंदिवसाच्या परिश्रमाला उत्पन्नाची झालर लागावी म्हणून एसटी महामंडळाकडून वेगवेगळ्या योजना जाहिर केल्या जातात.

गेल्या वर्षी महिलांना सरसकट पन्नास टक्के प्रवास भाड्यात सवलत जाहिर झाली आणि एसटीला लक्ष्मी पावली. एसटीच्या प्रवाशी संख्येत तसेच उत्पन्नातही लक्षवेधी भर पडली. सुगीचे दिवस आल्यागत एसटी बसेस भरभरून धावत आहेत. एकीकडे हे असे सुखद चित्र असताना काही चालक–वाहक अलिकडे प्रवाशांकडे दुर्लक्ष करत असल्याचीही तक्रार आहे.

बसमध्ये जागा असूनही प्रवाशांनी कुठे हात दाखविला तर एसटीचे चालक वाहक त्या प्रवाशांना दुर्लक्षित करून पुढे निघून जातात. अशा तक्रारी वाढल्या असतानाच यामुळे एसटीला होणाऱ्या अतिरिक्त उत्पन्नालाही फटका बसत आहे. ते ध्यानात घेऊन एसटी महामंडळाने चालक–वाहकांसाठी उत्पन्नावर आधारित प्रोत्साहन भत्ता योजना जाहिर केली आहे. आज १३ सप्टेंबरला राज्यातील मुंबई, नागपूरसह सर्वच विभाग नियंत्रकांना या योजनेसंबंधीची माहिती पाठविण्यात आली आहे.

### चालक, वाहकांना मिळणार २० टक्के –

प्रत्येक आगाराचे लेखाकार आणि सहायक वाहतूक अधीक्षक आर्थिक ताळेबंद काढून रक्कम तपासतील. त्यानंतर गेल्या वर्षीच्या उत्पन्नापेक्षा जेवढी जास्त (अतिरिक्त) रक्कम मिळाली, त्याच्या २० टक्के रक्कम प्रोत्साहन भत्ता म्हणून चालक, वाहकांना (१० – १० टक्के) विभागून दिली जाईल.



### ...तर, मिळणार नाही भत्ता –

या कालावधीत परिश्रम घेऊन, विशेष प्रयत्न करून चालक वाहकाने एसटीच्या तिजोरीत अतिरिक्त उत्पन्न ओतले आणि चुकून त्यांच्यापैकी कुण्या चालक वाहकाने प्रवाशांसोबत गैरवर्तन केले, त्याची तक्रार आल्यास त्या चालक किंवा वाहकाला प्रोत्साहन भत्त्याची रक्कम मिळणार नाही.

### अशी आहे योजना –

२१ सप्टेंबर ते २० ऑक्टोबर या ३० दिवसांच्या कालावधीत प्रायोगिक तत्वावर महामंडळाकडून ही योजना राबविली जाणार आहे. या दिवसांतील प्रत्येक फेरीच्या उत्पन्नाची गेल्या वर्षीच्या याच कालावधीतील (२१ सप्टेंबर ते २० ऑक्टोबर) प्रत्येक दिवसाच्या उत्पन्नाची तुलना केली जाईल. त्यानंतर गेल्या वर्षी या कालावधीत किती उत्पन्न होते आणि त्यापेक्षा किती जास्त उत्पन्न यावेळी मिळाले, त्या आकड्यांचा हिशेब केला जाईल.

## महिला बँकेच्या तत्कालीन सीईओसह चारजणांना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ यवतमाळ–** बाबाजी दाते महिला बँकेतील २४२ कोटी रुपये थकबाकीदार सभासद कर्जप्रकरणी तत्कालीन सीईओसह चौघांना एसआयटी पथकाने अटक केली. ही कारवाई शुक्रवारी दि. १३ सप्टेंबरला करण्यात आली असून सुजाता महाजन, विलास महाजन, बँक अधिकारी वसंत मोलीकर आणि कर्जदार नवलकिशोर मालानी अशी ताब्यात घेण्यात आलेल्या चौघांची नावे आहेत. शनिवारी या चौघांना एसआयटीन्यायालयात हजर केले जाणार आहे.

शहरातील बाबाजी दाते महिला बँकेचा परवाना नोव्हेंबर २०२२ मध्ये 'आरबीआयने' रद्द केला. बँकेवर जिल्हा उपनिबंधकांची – प्रशासक म्हणून नेमणूक केली.


दरम्यान अमरावती येथील – सहकार विभागाच्या लेखापरीक्षकाकडे लेखापरीक्षणाची जबाबदारी सोपवण्यात आली होती. दि. १ एप्रिल २००६ ते दि. ३१ – मार्च २०२१ या कालावधीत सर्व संचालक, अधिकारी व इतरांनी – संगणमत करून २४२ कोटी ३१ लाख २१ हजार १९ रुपयांची = फसवणूक केली असल्याचे त्यात आढळून आले. या प्रकरणी १३ ऑगस्ट २०२४ रोजी अवधुतवाडी ठाण्यात गुन्हा नोंदवला होता.

## ईद–ए–मिलादच्या पार्श्वभूमीवर १६ ला शहरातील वाहतूक मार्गात बदल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ अमरावती –** अमरावती शहरात १६ सप्टेंबर रोजी (एक दिवस मागे–पुढे चंद्र दर्शनानुसार) मुस्लीम बांधवाचे ईद–ए–मिलादनिमित्त मिरवणुक काढण्यात येतात. या कालावधीत मुख्य रस्त्यावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी वाहतूक मार्गात पुढीलप्रमाणे बदल करण्यात आले आहेत.

वाहतुकीचा पर्यायी मार्ग ट्रांसपोर्टनगर ते नागपुरी गेट चौक या मार्गावर मिरवणुक काळात सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंदराहील. इतर हलक्या वाहनांची म एकतर्फा वाहतुक सुरू राहील. चित्रा चौक ते पठाण चौक या मार्गावर मिरवणुक काळात सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंद राहील. इतर हलक्या वाहनांची वाहतुक प्रभात टॉकीज व दीपक चौक मार्गे वळविण्यात येईल. हनुमान नगर पोलीस चौकी ते पठाण



चौक या मार्गावर मिरवणुक काळात सर्व प्रकाराचा जड वाहनांना प्रवेश बंद राहील. इतर हलक्या वाहनांची वाहतुक महाजनपुरा मार्गे वळविण्यात येईल.जवाहर गेट ते टांगा पडाव या मार्गावर मिरवणुक काळात सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंद राहील. इतर हलक्या वाहनांची वाहतुक सराफा – गांधी चौक–जयस्तंभ मार्गे वळविण्यात येईल. लालखडी ते पठाण चौक या मार्गावर मिरवणुक काळात सर्व प्रकारच्या जड वाहनांना प्रवेश बंद

राहील. इतर हलक्या वाहनांची वाहतुक लालखडी रिंगरोड मार्गे वळविण्यात येईल. वाहन चालकांनी या अधिसूचनेचे पालन करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांच्याविरुध्द मोटार वाहन कायद्या व महाराष्ट्र पोलिस कायद्यांतर्गत करवाई करण्यात येईल. हा आदेश दि. १६ सप्टेंबरच्या (एक दिवस मागे–पुढे चंद्र दर्शनानुसार) सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत लागू राहील, सर्व नागरिकांनी वाहतुक मार्गातील बदलाबाबत सहकार्य करण्याचे आवाहन पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांनी केले आहे.

## कांद्यावरील किमान निर्यात मूल्य हटवले; केंद्राकडून निर्यात शुल्कातही २०% कपात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४ नवी दिल्ली–** केंद्र सरकारने कांद्यावरील ५५० डॉलर प्रतिटन किमान निर्यात मूल्य (मिनिमम एक्स्पोर्ट प्राइज) हटवले आहे. त्याचप्रमाणे निर्यात शुल्कामध्ये २० टक्के कपात करीत कांदा उत्पादकांना दिलासा दिला आहे.

वाणिज्य मंत्रालयाचे परदेश व्यापार महासंचालक संतोष कुमार सारंगी यांच्या स्वाक्षरीने एक अध्यादेश शुक्रवारी जारी झाला. सरकारने कांद्यावरील



निर्यातमूल्याची अट काढून, तसेच निर्यातशुल्कही निम्मे कमी करून २० टक्क्यांवर आणल्याने निर्यातदारांना हव्या त्या किमतीत कांदा निर्यातीची संधी आहे.

नाफेड आणि एनसीसीएफचा कांदा बाजारात आल्याने कांद्याचे भाव पडण्याची भीती शेतकऱ्यांना वाटत होती. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी, व्यापारी, निर्यातदार यांनी कांदा निर्यातीचे शुल्क कमी करण्याची मागणी केली होती. याचे कारण म्हणजे पाकिस्तान आणि अफगाणिस्तानचा कांदा भारतीय कांद्यापेक्षा कमी दरात जागतिक बाजारपेठेत उपलब्ध असल्याने भारतीय कांद्याची मागणी घटली होती. यामुळे सरकारने वरील निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.आता कांदा निर्यात करणे सोपे झाले असून, निर्यातीत वाढ होईल. त्यामुळे बाजारात नवीन येणाऱ्या कांद्याला चांगला भाव मिळेल. दिवाळीनंतर नवीन लाल आणि रांगडा कांदा बाजारात आल्यावर कांद्याचे भाव टिकून राहण्याची शक्यता आहे.

### 'बासमती'वरील निर्बंधदेखील हटविले

केंद्र सरकारने बासमती तांदळाच्यादेखील किमान निर्यात मूल्यावरील मर्यादा हटविली. बासमती तांदळावर ९५० डॉलर प्रति टन एवढी किमान मर्यादा होती. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये निर्यात मूल्य १,२०० डॉलर प्रति टनांवरुन घटवून ९५० डॉलरवर आणले होते. भारतातून गेल्या आर्थिक वर्षात ५.९ अब्ज डॉलर मूल्याची बासमती तांदळाची निर्यात झाली.

## खासगी अभिमत विद्यापीठाचा समावेश करा– आ.प्रतापदादा अडसड यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४धामणगाव रेल्वे–** मुलींना उच्च शिक्षण, मोफत शिक्षण योजनेमध्ये खासगी अभिमत विद्यापीठाचा तसेच स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे यांचा समावेश करण्याची मागणी आ. प्रताप अडसड यांची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार मुलींकरिता उच्च शिक्षणासाठी मोफत शिक्षण लागू झालेले आहे. परंतु निर्णयामध्ये खाजगी अभिमत विद्यापीठे तसेच स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे यांना वगळले आहे. खासगी अभिमत विद्यापीठांमध्ये सुद्धा आर्थिक




मागास असलेल्या मुली मोठ्या प्रमाणात आहे. शासन निर्णयातील या अटीमुळे अनेक मुलींना या योजनेपासून वंचित रहावे लागत आहे. याबाबतीत अनेक तक्रारी प्राप्त झाल्यामुळे ही बाब शासनाच्या लक्षात आणून देणे आवश्यक होते. आ. प्रताप अडसड यांनी शासनाला पत्र लिहीत यासंदर्भात तातडीने निर्णय घ्यावा व आर्थिक मागास असलेल्या सर्व मुलींना मोफत शिक्षणाचा लाभ मिळण्याकरिता खाजगी अभिमत विद्यापीठे व स्वयअर्थसहाय्यित विद्यापीठे यांचा योजनेमध्ये समावेश करण्याची मागणी केली आहे.

# शासनाच्या करवाढ स्थगितीला मनपा प्रशासनाकडून 'खो'

## मनपा आयुक्तांनी स्वयंस्पष्ट आदेश देत खुलासा करावा, शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

अमरावती मनपा क्षेत्रात सध्या करवाढीचा मुद्दा गाजत असून विद्यमान लोकप्रतिनिधी यांनी करवाढीवर स्थगिती आणल्याचा दावा करीत प्रसिद्ध मिळविण्याचा आणि श्रेय लाटण्याचा प्रयत्न चालविला आहे, पण शासनाने दिलेल्या आदेशात कर वसुली स्थगिती संदर्भात कुठलाही उल्लेख नसल्यामुळे अमरावतीकर नागरिकांमध्ये सध्या मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. हा सर्व प्रकार बघता मनपा आयुक्तांनी स्वयं स्पष्ट आदेश देत खुलासा करावा आणि अमरावतीकरांना दिलासा द्यावा अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केली आहे.शासनाने अमरावती महानगरपालिकेच्या वाढीव करास स्थगिती देणाऱ्या शासनाच्या उपसचिवाचे पत्रामध्ये ठरावाच्या स्थगन किंवा रद्दबाबत कोणतेही भाष्य केलेले नाही. या उलट फक्त २०२४ च्या कर पुनर्मूल्यांकन प्रक्रियेला स्थगिती दिल्याचे लिहिले असून कर पुनर्मूल्यांकन प्रक्रिया ही मार्च २०२३ पूर्वीच पूर्ण झाली असून आता फक्त कर वसुलीचे काम सुरू आहे. वास्तविक या अन्यायकारक करवाढीच्या स्थगनासाठी किंवा रद्द करण्यासाठी महानगरपालिकेच्या अधिनियमाच्या तरतूदचे स्पष्ट उल्लेख करून संबंधित ठरावाला व महानगरपालिका आयुक्तांच्या आदेशाला स्थगन दिल्याबाबतचा शासनादेश देणे आवश्यक होते ,परंतु असे न करता फक्त एक पत्र पाठवून अमरावतीच्या जनतेच्या डोळ्यात धूळफेक केली असल्याचाआरोप शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केला आहे. येणाऱ्या काही दिवसानंतर त्रोटक पत्र शासनाकडून सुधारित करण्याची शक्यता नाकारता येत नाही. अशा परिस्थितीत मनपा आयुक्तांनी या पत्राच्या आधारावर ठोस भूमिका घेणे आवश्यक होते. मात्र आयुक्तांनी अद्यापही याबाबत ठोस भूमिका घेतली नसल्याने



शासनाच्या या स्थागनादेशाला मनपा प्रशासनाकडूनच खो दिल्या जात असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. आयुक्तांनी वर्ष २०२३-२४ पासून लागू करण्यात आलेले वाढीव कर दर रद्द करून जुन्या दराने नागरिकांनी कर भरण्याबाबत आदेशित करावे व आजपर्यंत वाढीव करदराने भरण्यात आलेल्या कराबाबत स्पष्ट आदेश देत पुढील वर्षाच्या कर मागणीमध्ये समायोजित करण्यात येईल किंवा नागरिकांनी पूर्वीच्या करापेक्षा जास्तीचे भरलेल्या कर रक्कम परत करण्यात येईल असे उल्लेख करावे व त्याबाबतचे प्रमाणपत्र नागरिकांना देण्यात यावे. याबाबत एखाद्या नागरिकांनी पूर्वीपेक्षा दहापट जास्त दराने कर भरला असल्यास संबंधितांना पुढील दहा वर्ष कर भरण्याची आवश्यकता राहणार नाही अशा पद्धतीचे प्रमाणपत्र द्यावे किंवा त्यांचे अतिरिक्त घेण्यात आली रक्कम परत करण्यात यावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी मनपा आयुक्तांकडे केली आहे.

### मनपाचे करोडो रुपयांचे नुकसान

अमरावती महानगर पालिकेच्या कर विभागात कोट्यावधीचा कर घोटाळा झाला असून याबाबत आम्ही शासनाकडे व इतर विभागाकडे तक्रार केलेली आहे .सामान्य जनतेवर मोठ्या प्रमाणात कर लादून इतर मोठ्यांना बिल्डरांना, भूमाफियांना आपल्या पदाचा गैरवापर करून गेल्या पंधरा ते वीस वर्षापासून करच लावलेला नाही किंवा अतिशय कमी कर लावलेला आहे .यामुळे महानगरपालिकेला जवळपास २०० कोटीचा नुकसान झालेले आहे. या तक्रारीमुळे खळबळून जागे होऊन आता संबंधित अधिकारी मागील वीस वर्षापासून ज्या भूमाफियांना मदत



केलेली आहे व त्यांना आजपर्यंत कोणतेही कर मागणी नोटीस पाठवलेली नाही त्यांच्यापासून सामान्य जनतेने भूखंड घेतल्यामुळे आता त्यांना मागील वीस वर्षांची कर मागणी करण्यात येत आहे .परंतु मागील वर्षात जर महानगरपालिकेने कर मागणी नोटीस दिल्या नसेल तर त्या वर्षीचे कर रक्कम लॅप्स/ होते व महानगर पालिकेला कर मागणी नोटीस दिली नसल्यास मागील वर्षाचे कर मागता येत नाही असे न्यायालयाने वेळोवेळी आपल्या आदेशात नमूद केलेले आहेत व कायद्यात तशी तरतूद आहे. त्यामुळे अशा पद्धतीने महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याने केलेल्या चुकीमुळे मनपाला झालेल्या कोट्यावधीचा कराचे नुकसान सामान्य जनतेकडून नियमबाह्यरीत्या वसूल करण्या साठी कोणीही थकीत कराची मागणी करीत असल्यास याबाबत माझ्याशी संपर्क करावा असे आवाहन देखील शिवसेना जिल्हाप्रमुख सुनील खराटे यांनी केले आहे.

# राहुलजींच्या केसालाही धक्का लागू देणार नाही

## भाजपावाल्यांनो गळा काढणे बंद करा, ॲड. यशोमती ठाकूर कडाडल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

काँग्रेसचे आणि देशाचे विरोधी पक्ष नेते माननीय राहुल गांधी यांच्या विधानाचा विपर्यास करून गळा काढणे बंद करा, राहुलजीं च्या केसालाही धक्का लावण्याचा विचार करू नका, असा सज्जड इशारा काँग्रेसच्या नेत्या आणि माजी मंत्री ड.यशोमती ठाकूर यांनी दिला आहे.राहुल गांधी यांनी आरक्षणाबाबत केलेले वक्तव्य समजून न घेता जनतेची दिशाभूल करतराहुल गांधींना बदनाम करण्याचा भाजपचा डाव आहे, असा आरोप ड. ठाकूर यांनी केला. यावेळी बोलताना ड.ठाकूर पुढे म्हणाल्या की, काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या विरोधात आंदोलन करणाऱ्या भाजपने सुरू केलेले आंदोलन म्हणजे राहुल गांधींना बदनाम करण्याचा भाजपने विडा उचललेला आहे, अर्धवट गोष्टी ऐकायच्या आणि जाणीवपूर्वक अर्धवटा सारखे वागायचे हा भाजपचा शिरस्ताच आहे असेही त्या म्हणाल्या. राहुल गांधींच वक्तव्य पूर्ण ऐकलं पाहिजे, ज्या दिवशी देशात पूर्ण समानता येईल त्या दिवशी काय चित्र असेल, कुणालाही कशी आरक्षणाची गरज भासणार नाही, असे राहुलजी यांनी म्हटले होते. मात्र या देशात



भाजपवाल्यांना समानता आणायची नाही, राहुल गांधी यांची बदनामी खपवून घेणार नाही, जनतेची दिशाभूल करून देश भरकटला जाणार नाही. त्यामुळे तुमची नौटंकी बंद करा, राहुल गांधी यांना जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात आहेत, पण लक्षात ठेवा राहुल गांधी यांच्या केसालाही धक्का लागू देणार नाही, असा सज्जड इशाराच ड. यशोमती ठाकूर यांनी दिला आहे.

# हृदयद्रावक! वडिलांच्या पार्थिवाला खांदा देत दिला मुखाग्नी

## १९ वर्षीय मुलींने पार पाडलं मुलाच कर्तव्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अंजनगाव सुर्जी**

– मृत्यूनंतर पार्थिवाला मुलाने खांदा द्यावा आणि त्यानेच अग्निडाग द्यावा, अशी प्रथा आहे. मात्र, या सर्व रीतीरिवाजांना फाटा देत अंजनगाव तालुक्यातील कालवाडा मुऱ्हा येथे एका मुलीने वडील बंडू पाटील यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पार्थिवाला खांदा दिला. बंडू पाटील यांना तीन मुली आहेत त्यातील सर्वात लहान असलेल्या असलेल्या कु.निकिताने अग्निडाग दिला.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कालवाडा मुऱ्हा येथील बंडू पाटील वय ५५ वर्षीय हे मागिल चार वर्षांपासून कर्करोगाशी सामना करत होते. अखेर त्यांची मृत्यूशी झुंज १३ सप्टेंबर रोजी संपली .त्यांच्या पश्चात पत्नी आणि तीन मुली आहेत. त्यापैकी दोघी मुलींचा विवाह झालेला आहे.

बंडू पाटील यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर अंत्यसंस्कार कोणी करावे,



असा प्रश्न निर्माण झाला. पाटील यांना एक भाऊ आहेत. त्यांना एक मुलगा आहेत. त्यांच्या हस्ते अंत्यसंस्कार करावा, असा सल्ला काहींनी दिला. त्यासाठी रीतीरिवाज आणि धर्मशास्त्राचे दाखले देण्यात आले.

वडिलांच्या मृत्यूच्या दुःखात असलेल्या मुलींपर्यंत ही चर्चा गेली आणि तिन्ही मुलींनी आपले दुःख आवरत आम्हीच आमच्या वडिलांवर अंत्यसंस्कार करू, असा निर्णय घेतला. त्यानंतर काहींनी या निर्णयाला विरोधही केला. मात्र, आमच्या वडिलांचा अंत्यसंस्कार आम्हीच करू. आम्हीच त्यांचे मुलं आहोत, असे ठामपणे पाटील यांच्या तिन्ही मुलींनी उपस्थित सर्वांना सांगितले. बंडू पाटील यांच्या दोन मुलींचे लग्न झाले त्यातील मोठी मुलगी नम्रता गौरव वानखडे ही एक महिन्याची बाळंतीण आहे दुसऱ्या नंबर मुलगी अंकिता अमोल ठाकरे हिचा नवव्वा महिना चालू असल्याने नातेवाईकांनी दोन्ही मुलींना वडिलांच्या पार्थिवाचे दर्शन करून घरीच थांबण्याचा सल्ला दिला.त्यानंतर कु अंकिता आणि जावयांनी वडिलांना खांदा दिला. तसेच अंकिताने बंडू पाटील यांच्या पार्थिवास अग्निडाग दिला हिंदू रितीरिवाजांनुसार अंत्यसंस्कार केले. हे दृश्य पाहून काही लोक रडायला लागले.

हिंदू धर्मामध्ये महिलांना स्मशानभूमीत जाण्यास मनाई आहे. पण आता समाजातील जुन्या परंपरा आणि समजुती मोडून लोक पुढाकार घेत असलेलं पाहायला मिळत आहे. अशाप्रकारे मुलींने वडिलांवर अंत्यसंस्कार केले असून नवा आदर्श निर्माण केला आहे.

# विसर्जन मिरवणूक मार्गाची अधिकाऱ्यांनी केली पाहणी:

## अंजनगाव सुर्जीत घेतला महसूल, पोलिस प्रशासनाने आढावा

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.१४ अंजनगाव सुर्जी**

शहरातील गणेश उत्सव विसर्जन मिरवणूक मार्गाची शुक्रवारी (दि. १३) पाहणी करण्यात आली. या वेळी महसूल विभाग, पोलिस विभाग, नगर परिषद, महावितरण कंपनीसह सर्व विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या वेळी गणपती विसर्जन मिरवणूक मार्गाची पाहणी मिरवणूक मार्गात येणारे अडथळे दूर करण्यासाठी संबंधितांना तत्काळ प्रशासनाकडून सूचना देण्यात आल्या. तसेच काही विशिष्ट धार्मिक स्थळ परिसरात बॅरिकेड्स लावण्याकरिता जागा ठरवण्यात आल्या आहेत.

गणेश उत्सव विसर्जन मिरवणूक मार्गाची पाहणी करून या मार्गात येणारे अडथळे तसेच आवश्यक ठिकाणी बॅरिकेड्स लावणे तसेच अतिरिक्त लाइटची व्यवस्था करणे, मिरवणूक मार्गावर सीसीटीव्ही कॅमेरे लावणे याकरिता अंजनगाव शहरातील विसर्जन मिरवणूक मार्गावर तहसीलदार पुष्पा सोळंके, नगर परिषदेचे मुख्याधिकारी दादाराव डोल्लारकर, ठाणेदार प्रकाश



अहिरे, नायब तहसीलदार रवींद्र काळे, नगर परिषदेचे आरोग्य अभियंता प्रतीक वाटाणे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

अंजनगाव शहरातील गणपती विसर्जन मिरवणूक अनंत चतुर्थी मंगळवार (दि. १७) निघणार असून, एकूण ४१ सार्वजनिक मंडळाच्या गणपतीचे विसर्जन मिरवणुकीचा सहभाग राहणार आहे. त्यात शहरातीलच गुलजारपुरा व सुर्जी भागातील विसर्जन मिरवणूक बुधवारी (दि. १८) होणार असून, या दिवशी एकूण २० सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा सहभाग राहणार आहे.

तसेच अंजनगाव पोलिस स्टेशनच्या हद्दीतील गावांमधील अनुक्रमे मंगळवारी ४ मंडळ, बुधवारी ९ मंडळ, तर गुरुवारी (दि. १९) २२ मंडळाच्या गणपतींचे विसर्जन होणार असून, पोलिस प्रशासनासह महसूल विभाग, महावितरण कंपनी, बांधकाम विभाग विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडावी याकरिता विशेष लक्ष देऊन आहे.

# कोणी जागा देता का ? जागा

## मनपाला पीएम ई-सिटी बस चार्जिंग स्टेशनसाठी जागाच मिळेना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती–** अमरावती केंद्र सरकारच्या पीएम ई-सिटी बस सेवेसाठी बस डेपो, चार्जिंग स्टेशन मनपाला उभारायचे आहे. यासाठी त्यांचा जागेसाठी शोध सुरू असून, सध्यातरी जागा मिळत नसल्याचे दिसून येत आहे. बडनेरा येथील कोंडेश्वर परिसरात २.३८ हेक्टर ई-क्लास जागा मनपाने यासाठी घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, ती जागा मिळाली नाही. राज्य शासनाच्या महसूल आणि वन विभागाचे अव्वर सचिव डॉ. वसंत माने यांनी २९ ऑगस्टला जिल्हाधिकाऱ्यांना पत्र पाठवून बडनेरा सर्व्हे क्र. ११० येथील २.३८ हेक्टर शासनाची जमीन इलेक्ट्रिक बस डेपो व चार्जिंग स्टेशनसाठी मनपाला देण्यात यावी, असे म्हटले आहे. या जागेचा ताबा घेण्यात काही तांत्रिक अडचणी असतील तर त्या कमी झाल्याशिवाय मनपाला जमीन मिळणार नाही. तोपर्यंत



केंद्र सरकारकडून आलेले ५ कोटी रुपये तसेच पडून राहणार आहेत. या शासकीय जमिनीची किंमत बघता मनपाने २.५ कोटी रुपये मागितले आहेत. कारण,

### केंद्राकडून आलेले ५ कोटी रुपये जाणार परत

सध्या आर्थिक चणचणीत असलेल्या मनपाला एवढी मोठी रक्कम स्वत:जवळून देणे शक्य नाही. म्हणूनच मनपा प्रशासन ई सिटी बस सेवेसाठी कमीत कमी दरात जमीन मिळावी यासाठी प्रयत्न करत आहे. जागा मिळेपर्यंत शहरवासीयांना ई-बस सेवेसाठी प्रतीक्षा करावी लागणार आहे.

# महावितरणच्या आढावा बैठकीत शेतकरी आक्रमक.दिवसाला आठ तास वीज द्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ तिवसा–**

महावितरण कंपनीकडुन शेतकऱ्यांना आठवड्यातून तीन दिवस सकाळी व चार दिवस रात्री विद्युत पुरवठा करण्यात येतो.परंतु रात्रीचे सिंचन करणे अतिशय जोखमीचे असल्याने रात्री ऐवजी दिवसा विद्युत पुरवठा करण्यात यावा अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली.तिवसा – तालुक्यातील महावितरणचा ढेपाळलेला कारभार व महावितरण विरोधात



तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वाढत्या तक्रारीची दखल घेत आ.यशोमती ठाकुर यांनी गुरुवारी तहसिल कार्यालयातील सभागृहात महावितरणचे कार्यकारी अभियंता यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेतली.याप्रसंगी आ.यशोमती ठाकुर सह महावितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता अनिरुद्ध आलेगावकर , तिवसा येथील उपविभागीय अभियंता नितीन उईके, नगराध्यक्ष योगेश वानखडे, माजी नगराध्यक्ष तथा तालुका कार्यकारी अध्यक्ष वैभव वानखडे, माजी जि.प.सभापती दिलीप काळबांडे,पं.स.सभापती कल्पना दिवे,शिल्पाताई हांडे, सुरेशराव मेटकर, शरद वानखडे, चंद्रशेखर ठाकूर, विवेक देशमुख, मुकुंदपुनसे, मोहन वानखडे, दिनेश वानखडे, दीपक सावरकर आदी उपस्थित



होतेभारत ढोणे, रितेश पांडव, माजी नगरसेवक नरेंद्र विघ्ने तसेच तालुक्यातील महावितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता, सहायक अभियंता, कर्मचारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रत्येक गावातून आलेल्या शेतकऱ्यांनी आपला रोष व्यक्त करत आपापल्या गावातील महावितरण चा भोंगळ कारभार चव्हाट्या वर आणला.तसेच तालुक्यातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा कामचुकारपणा,व महावितरण कंपनीच्या अनागोंदी कारभारामुळे शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या कार्यकारी अभियंता अनिरुद्ध आलेगावकर यांच्या पुढ्यात मांडल्या*.त्यावर स्थानिक अधिकाऱ्यांची कानउघाडणी करून तालुक्याती ल समस्यांचे लवकरात लवकर निराकरण करण्यात येईल असे अनिरुद्ध आलेगाव कर यांनी उपस्थित शेतकऱ्यांना आश्वस्त केले.

# गणेशोत्सव मंडळाला भेट!



भाजपा अमरावती शहर अध्यक्ष आ. प्रविण पोटे पाटील यांनी अमरावती शहरातील विविध गणेशोत्सव मंडळाला भेट देत आरती मध्ये सहभाग घेतला

# गणेश विसर्जन, ईदनिमित्त स्वच्छतेसाठी मनपात अधिकारी, कर्मचाऱ्यांना शपथ

## सामान्य नागरिक म्हणतात नुसत्या शपथा घेऊन काय फायदा?



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

स्वच्छ सर्वेक्षण २०२४, स्वच्छता ही सेवा २०२४, गणेश विसर्जन तसेच ईदच्या अनुषंगाने महापालिका उपआयुक्त (प्रशा.) डॉ. मेघना वासनकर यांच्या अध्यक्षतेत राजापेठ झोन क्रमांक २ येथे घेण्यात आलेल्या सभेत १४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबरपर्यंत राबवण्यात येणाऱ्या स्वच्छता ही सेवा उपक्रमांतर्गत उपायुक्त डॉ. वासनकर यांच्यासह अधिकारी, कर्मचाऱ्यांनी स्वच्छतेची शपथ घेतली.मात्र यावर सामान्य नागरिकांनी आपल्या प्रतिक्रिया देत नुसत्या शपथा घेऊन काय फायदा?खरोखरच हे अधिकारी प्रामाणिकपणे काम करतील का असा सवाल उपस्थित केला .मनपा मुख्यालय, झोन कार्यालय, मनपा आरोग्य केंद्र येथे स्वच्छतेची शपथ घेऊन सर्व कार्यालयाची साफसफाई करणे, गणेश विसर्जन स्थळी, तलाव, पर्यटन स्थळावर शून्य कचरा कार्यक्रम राबवणे व सर्व मनपा आरोग्य केंद्र सफाई मित्र सुरक्षा शिबिर, आरोग्य शिबिर, लसीकरण शिबिर आयोजित करणे, मार्केट व व्यावसायिक क्षेत्र येथे झोन निहाय युद्धस्तरावर प्लास्टिक बंदी मोहीम राबवण्याचे निर्देश मनपा उपायुक्तांनी दिले.सर्व ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक व स्वास्थ्य निरीक्षकांनी गणेश विसर्जन व ईद निमित्त प्रभागातील सर्व ठिकाणी नाल्या बुडापासून स्वच्छ कराव्यात. १०० टक्के कचरा संकलन करून घ्यावे. परिसरातील घरोघरी घंटागाडी जायलाच हवी. या सर्व बाबींबद्दल योग्य नियोजन करून साफ सफाई करून घेण्याचे निर्देश मनपा उपायुक्तांनी दिले. या बैठकीला सहायक आयुक्त भूषण पुसतकर, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ. अजय जाधव, राजू डिक्याव, विजय बुरे, कुंदन हडाले, शारदा गुल्हाणे, राजेश राठोड, स्वच्छ भारत अभियान अमरावती शहर समन्वयक डॉ. श्वेता बोके, सर्व स्वास्थ निरीक्षक उपस्थित होते.

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा १० नोव्हेंबर रोजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२४ आगामी काळात दि. १० नोव्हेंबर २०२४ रोजी घेण्यात येणार आहे..

इयत्ता पहली ते पाचवी व इयत्ता सहावी ते आठवीसाठी सर्व व्यवस्थापन, सर्व परीक्षा मंडळे, सर्व माध्यम अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित इत्यादी शाळांमध्ये शिक्षण सेवक व शिक्षक पदावर नियुक्तीसाठी उमेदवारांना प्रथमतः ही परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. या परीक्षेशी संबंधित सर्व शासन निर्णय, अनुषंगिक माहिती, सुचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या https://mahatet.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

ऑनलाईन अर्ज भरणे, परीक्षा शुल्क भरणे, परीक्षेची वेळ व इतर सविस्तर माहितीचा तपशील परिषदेच्या उपरोक्त वेबसाईट वर देण्यात आला आहे. सर्व संबंधितांनी संकेतस्थळास नियमित भेट द्यावी. सदर परीक्षेची ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया दि. ९ सप्टेंबर पासून सुरु झाली असुन दि. ३० सप्टेंबर २०२४ अखेरपर्यंत उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरता येतील, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी दि. ९ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२४ राहील. प्रवेशपत्र ऑनलाईन प्रिंट काढुन घेण्याचा कालावधी दि. २८ ऑक्टोबर ते १० नोव्हेंबर २०२४ राहील. शिक्षक पात्रता परीक्षा पेपर ख दि. १० नोव्हेंबर २०२४ व वेळ सकाळी १०.३० ते १.०० पर्यंत राहील. शिक्षक पात्रता परीक्षा पेपर खख दि. १० नोव्हेंबर व वेळ दुपारी २.०० ते ४.३० पर्यंत राहील, पात्रता परीक्षेच्या तारीख व वेळ यासंबंधी नोंद घ्यावी, असे आवाहन संजय कुमार राठोड महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे उपायुक्त संजय कुमार राठोड यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

# ऑटो चालकाच्या छेडखानी ला विद्यार्थिनीने दिले सडेतोड उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती,**

शहरातील महिला व मुली सुरक्षित आहे की नाही, असा प्रश्न आता गुरुवारी शहरातील प्रिया रेसिडेन्सी रोडवर भरदिवसाघडलेल्याघटनेने निर्माण झाला आहे. रिक्षाचालकाने विद्यार्थिनीला निर्जनस्थळी नेऊन तिच्यावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. मात्र जिगरबाज मुलीने न डगमगता ऑटोरिक्षात ठेवलेला लोखंडी पाईप पकडला आणि या पाईपने ऑटोचालकाच्या डोक्यावर हल्ला करून तिने कशीतरी स्वतःची तावडीतून सुटका करून घेतली व सुरक्षित घरी पोहोचली. या घटनेने खळबळ उडाली असून पालक वर्गामध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गाडगेनगर पोलीस आरोपी रिक्षा चालकाचा कसून शोध घेत आहेत.शहरातील एका प्रतिष्ठित महाविद्यालयातील बारावीत शिकणाऱ्या विद्यार्थिनीने तक्रारीत म्हटले आहे की, ती राठी नगरमध्ये कोचिंग क्लासला जायला निघाली होती. दररोज २ ते ६ वाजेपर्यंत दरम्यान वर्ग असतात. वलगाव त्यांनी चेतक बारजवळ ऑटो रिक्षात बसली रिक्षाचालकाने तोंडावर काळा मास्क लावला होता त्यांचे वय ४० वर्षे असेल.पोलीस त्या ऑटो चालकाचा तपास करीत आहे.

**पाईप हातात आला आणि...**

विद्यार्थिनीने नराधमा पासूनस्वतःचीसुटकाकरण्यासाठी रिक्षाच्या फूटबोर्डमध्ये पडलेला - लोखंडी पाईप घेतला. आणि पूर्ण ताकदीने पाईप रिक्षाचालकाच्या डोक्यावर मारला.आणि स्वतःची सुटका करून घेतली मुलीने केलेल्या या धाडसाचे आज शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.


# कंत्राटी शिक्षक पद्धतीला ग्रामस्थांचा व शिक्षक संघटनांचा विरोध

## भावी शिक्षकांचे भविष्य अंधारात; अनेक शाळांना फटका बसण्याची शक्यता : अमरावती जिल्ह्यात ३८० शाळा २० पटाच्या खाली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि१४अमरावती**

राज्यात जिल्हा परिषदेच्या २० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये सेवानिवृत्त शिक्षक किंवा डी.एड., बी.एड. अर्हताधारक उमेदवार कंत्राटी तत्त्वावर नियुक्त करण्याच्या निर्णयाला शिक्षक संघटनेबरोबरच ग्रामस्थ आणि सुशिक्षित बेरोजगार यांचा तीव्र विरोध होत आहे. शिक्षक दिनाच्या दिवशी शासनाने घेतलेला हा निर्णय रद्द करण्याची मागणी होत आहे.

शासनाच्या या निर्णयानुसार कमी पटसंख्या असलेल्या सर्वच शाळांना सेवानिवृत्त शिक्षक उपलब्ध होत नाहीत, अशा ठिकाणी पद रिक्त राहिल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होणार आहे.अमरावती जिल्ह्यातील डोंगराळ क्षेत्र असलेल्या तालुक्यातील शाळांना या निर्णयामुळे मोठा फटका बसणार असण्याची शक्यता आहे. तसेच या निर्णयाने शिक्षक होण्याच्या प्रतीक्षेत असणाऱ्या महाराष्ट्रातील लाखो उमेदवारांवर अन्याय होणार आहे. दिवसेंदिवस बेरोजगारी वाढत चालली आहे. बेरोजगारी वाढत चालल्यामुळे सुरक्षित बेरोजगारांच्या मनाचे संतुलन बिघडले असून भावी शिक्षकांचे भविष्य अंधारात ढकलले जात आहे.अमरावती जिल्हात १४तालुक्यात ३८०शाळा ह्या २०पटसंख्येच्या खाली आहे.या शासन निर्णयामुळे दोन शिक्षक कार्यरत असलेल्या शाळेवरील एका शिक्षकाची बदली होणार असुन त्याला इतर शाळेवर नियुक्त केले जाणार आहे.त्यांच्या जागेवर सेवानिवृत्त शिक्षक कींवा डी.एड.धारक यांची कंत्राटी नेमणुक करण्यात येणार आहे.हा बेरोजगार युवकांवर अन्याय आहे.



डी.एड. आणि बी. एड. पदवी मिळवल्यानंतर पुन्हा शिक्षक पात्रता परीक्षा आणि अभियोग्यता परीक्षांचे दिव्य पार पडल्यावर आतातरी आपली शिक्षक म्हणून नियुक्ती होईल, या आशेने बसलेल्या भावी शिक्षकांची शासनाकडून अशाप्रकारे कंत्राटी शिक्षक नेमून एक प्रकारे त्यांची थट्टाच आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिक्षक भरतीतील आपले अपयश लपविण्याचा हा एक शासनाचा प्रयत्न आहे, म्हणून आमचा या सर्व प्रक्रियेला तीव्र विरोध आहे. दर सहा महिन्याला टीईटी आणि दर वर्षी अभियोग्यता घेण्याच्या आपल्या निर्णयास सरकारने स्वतःच हरताळ फासला आहे.

**प्रमोद कांबळे, शिक्षक पात्रता धारक तरुण,उत्तमसरा**

बेरोजगारांना तरुणांनाच रोजगार दिला पाहिजे. सेवानिवृत्त शिक्षक त्यांचे कर्तव्य बजावून सेवानिवृत्त झाले आहेत. सेवानिवृत्तीनंतर वयोमान, शारीरिक व्याधी, आजारपण यामुळे नव्या उत्साहाने, जोमाने शिकविण्याचे कार्य होणार नाही. आणि सेवानिवृत्त शिक्षकांची मानसिकता आणि क्रयशक्ती ही राहत नाही.

**अशोक पारडे,अमरावती जिल्हाध्यक्ष, सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक समिती**

१)अचलपूर-३२२)अमरावती-२९३)अंजनगाव सुर्जी-३१४)भातकुली-४१५)चांदुर बाजार-३४६)चांदुर रेल्वे-१६७)चिखलदरा-२४८)दर्यापूर-५०९)धामणगाव रेल्वे-१११०)धारणी-८११)मोर्शी-२०१२)नांदगाव खंडे.२८१३)तिवसा-२०१४)वरुड-२७एकुण=३७१ प्राथमिक+९माध्यमिक =३८०

३८० शाळा आहेत. काही १-४, काही १-५, काही,१-७, काही १-८ आहेत.

कमी पटसंख्येच्या नावाखाली नियमित शिक्षकालाच हद्दपार करायचे अशा प्रकारचा निर्णय शासनाने शिक्षक दिनीच घेतला. हा निर्णय शिक्षकांच्या अस्मितेलाच धक्का देणारा, कमी पटसंख्येच्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेसाठी मारक आहे. या निर्णयाच्या विरोधात राज्यात आंदोलन करण्यात येणार आहे.आज पुणे येथे राज्यातील सर्व शिक्षक संघटनेची सभा होत असुन आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार आहे.

**राजेश सावरकर, राज्य प्रसिध्दी प्रमुख, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

# एका हातात स्टेअरिंग, दुसऱ्या हातात मोबाईल; हजारांचा दंड

## १.३२ लाख चालकांना दंड : अनपेड चालानची रक्कम सहा कोटींवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

डिजिटलच्या जमान्यात स्मार्टफोन हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. मात्र, वाहन चालवताना त्याचा वापर करणे महागात पडू शकते. तरीही, बरेच लोक गाडी चालवताना कॉल किंवा मेसेज करण्यासाठी त्याचा वापर करतात. लोक वाहन चालवताना सोशल मीडिया तपासण्यासाठीही फोन वापरतात. पण, तुम्हाला माहीत आहे का की गाडी चालविताना मोबाइल वापरणे हा कायदेशीर गुन्हा आहे आणि त्यासाठी तुम्हाला दंडसुद्धा होऊ शकतो.

अमरावती ग्रामीण पोलिसांनी जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांच्या कालावधीत वाहन चालविताना मोबाइलवर बोलणाऱ्या एकूण ४२८ वाहनधारकांना ४ लाख ५६ हजार रुपये दंड आकारला. मात्र, केवळ सहा जणांनी सात हजार रुपये दंड भरला. तर, ४२२ वाहनचालकांनी ४.४९ लाख रुपये दंडाकडे पाठ फिरविली. तो दंड अनपेड राहिला.

आठ महिन्यांत९४ लाख वसूलआठ महिन्यांत एकूण ७ कोटी ३ लाख ८४ हजार रुपये दंड आकारण्यात आला. मात्र, केवळ ३४ हजार ८५९ वाहनचालकांनी ९४ लाख ६ हजार २०० रुपये दंड भरला. तर,



९७ हजार ३१० वाहनचालकांनी दंडाकडे पाठ फिरविली.

**मोबाइलवेड्यांना ४.५६ लाखांचा दंड**

ग्रामीण वाहतूक पोलिसांनी जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांत ४२८ मोबाइलवेड्या चालकांना ४ लाख ५६ हजार रुपये दंड ठोठावला. यात दुचाकीचालकांसह चारचाकीचालकही आहेत. ते मोबाइलधारक वाहनचालक अपघातांसाठी कारणीभूत ठरतात.

**२३ हजार वाहनचालक सिटबेल्टविना**

जानेवारी ते ऑगस्टदरम्यान तब्बल २३ हजार ९०६ वाहनचालक सिटबेल्टविना आढळले. त्यांना ५१ लाख ४७ हजार रुपये दंड आकारण्यात आला. पैकी केवळ १५ हजार वाहनचालकांनी ३१ लाख ८६ हजार ४०० रुपये दंड भरला.

ऑगस्ट अखेरपर्यंत १ लाख ३२ हजार वाहनचालकांना एकूण ७ कोटींहून अधिकचा दंड आकारण्यात आला. पैकी ९४ लाख रुपये वसूल करण्यात आले. अनपेड चालानची रक्कम ६ कोटींवर पोहोचली आहे.

**– सतीश पाटील, पोलिस निरीक्षक, जिल्हा वाहतूक शाखा**

# बाळाचे बारसे करून पुण्याला निघाले अन्... 'ड्रंक अ‍ॅण्ड ड्राईव्ह'ने घेतला चौघांचा जीव

## अपघातात अमरावतीच्या बाळासह आई-आजीचा दुर्दैवी मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

दहा वर्षांनंतर झालेल्या बाळाचे बारसे आटोपून पुण्याला जाणाऱ्या कुटुंबाच्या कारला स्कॉर्पिओने जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात आजी आणि आईसह दीड महिन्याच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला. ही हृदय पिळवटून टाकणारी घटना शुक्रवारी (१३ सप्टेंबर) दुपारी ४ च्या सुमारास संभाजीनगर शहरापासून जवळच असलेल्या नगर रोडवरील लिंबेजळगाव परिसरातील टोलनाक्याजवळ घडली.



अमरावती येथील अजय बेसरकर हे अभियंते कुटुंबासह पुण्याला जात असताना लिंबेजळगाव येथे हा अपघात झाला. मृणाली अजय बेसरकर (३६, रा. अमरावती),आशालता हरिहर पोपळघट (६४) व अमोघ बेसरकर (दीड महिने) आणखी एक अशी मृतांची नावे आहेत, तर अजय देसरकर गंभीर झाले. अजय हे पुण्यात सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून काम करतात. त्यांची पत्नी मृणाली दोन महिन्यांपासून गावाकडे आली होती. चार दिवसांपूर्वी त्यांच्या नवजात मुलाच्या बारशाचा कार्यक्रम आटोपून ते पुण्याला जात असताना लिंबेजळगाव परिसरात छत्रपती संभाजीनगरकडे जाणाऱ्या स्कॉर्पियोकारचे नियंत्रण सुटून दुभाजक चढून त्यांनी देसरकरांच्या कारला जोरदार धडक दिली. यात कारमधील चौघे जखमी झाले. जखमींना नागरिकांनी तत्काळ रुग्णालयात दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी मृणाली, आशालता व दीड महिन्याच्या अमोधला मृत घोषित केले.

**पोलिसांनी दोघांनाही केली अटक**

दरम्यान, पोलिसांनी फरार झालेल्या दोघांचा शोध घेतला आणि त्यांना अटक केली. विशाल उर्फ उद्धव ज्ञानेश्वर चव्हाण (वय २२, रा. बक्वाल नगर वाळूज, ता. गंगापूर), कृष्णा कारभारी केरे (वय १९, बक्वाल नगर वाळूज) अशी आरोपींची नावे आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, उद्धव चव्हाण हा चालक होता. पण, त्याने लायसन्स नसताना आणि मद्यपान केलेल्या कृष्णा केरे याला गाडी चालवायला दिली. भरधाव गाडीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात घडला.त्यांच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांच्या रक्ताचे नमुने घेण्यात आल्याचही वाळूज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र सहाने यांनी सांगितले.

**आनंद काळाने हिरावला**

अजय व मृणाली यांना दहा वर्षांनंतर बाळ झाल्याने त्यांनी मोठ्या आनंदात बारशाचा कार्यक्रम केला. पुण्यात मृणाली व बाळाची काळजी घेण्यासाठी अजय यांनी त्यांच्या सासू आशालता पोपळघट यांना सोबत नेत असतानाच काळाने त्यांच्यावर घाला घातला. या अपघाताची नोंद वाळूज पोलिस ठाण्यात करण्यात आली.

# ईद-ए-मिलादची सार्वजनिक सुट्टी १६ ऐवजी १८ सप्टेंबरला; महाराष्ट्र सरकारचा निर्णय

## जिल्हाधिकाऱ्यांना स्थानिक परिस्थिती पाहता सुट्टी बदलाचा निर्णय घेता येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ मुंबई**



अनंत चतुर्दशी आणि ईद-ए-मिलाद सण एकामागोमाग एक असल्याने दोन्ही समाजांमध्ये शांतता आणि सौहार्द रहावे यासाठी ईद ए मिलादची सार्वजनिक सुट्टी सोमवार, दि.१६ सप्टेंबर, २०२४ ऐवजी बुधवार, दि. १८ सप्टेंबर, २०२४ रोजी देण्यात आली आहे. हा बदल मुंबईपुरताच मर्यादित असला तरी उर्वरित महाराष्ट्रातील जिल्हाधिकाऱ्यांना स्थानिक परिस्थिती विचारत घेऊन सुट्टी बदलाचा निर्णय घ्यावा असे आदेश देण्यात आले आहेत.

ईद-ए-मिलाद ची सार्वजनिक सुट्टी दि.१६ ऐवजी १८ सप्टेंबर रोजी करण्यात आल्याची अधिसूचना शुक्रवारी काढण्यात आली. ईद-ए-मिलाद हा मुस्लिम धर्मियांचा सण मुस्लिम बांधव मोठ्या प्रमाणात साजरा करत असतात. यावेळी जुलूस कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. १७ सप्टेंबरला अनंत चतुर्दशी हा हिंदूचा सण असल्याने दोन्ही समाजामध्ये शांतता व सामाजिक सलोखा कायम राहण्याच्या हेतूने यावर्षी मुंबई शहर, मुंबई उपनगर व इतर काही जिल्ह्यांमध्ये मुस्लिम धर्मियांनी १८ सप्टेंबरला जुलूस काढण्याचा निर्णय घेतला आहे.

यामुळे सुट्टी देखील त्या दिवशी द्यावी अशी मागणी मुस्लिम आमदार आणि संघटनांनी केली होती. यानुसार हा निर्णय घेण्यात आला आहे.

मुंबई शहर व मुंबई उपनगर या जिल्ह्यात सोमवार, दि.१६ सप्टेंबर, २०२४ करिता घोषित केलेली ईद-ए-मिलाद ची सार्वजनिक सुट्टी रद्द करून ती आता बुधवार, दि. १८ सप्टेंबर, २०२४ या दिवशी जाहीर करण्यात आली आहे. राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकारी यांनी मुस्लिम धर्मियांकडून काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीचा दिनांक विचारात घेऊन १६ सप्टेंबरची सार्वजनिक सुट्टी कायम ठेवावी किंवा ती रद्द करून १८ सप्टेंबर करावी, अशा सूचना करण्यात आल्या आहेत. याबाबतचा निर्णय जिल्हाधिकाऱ्यांना घेण्याचा अधिकार सामान्य प्रशासन विभागाने दिला आहे.

# राज्यभरात ३५९ दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची चौकशी सुरू : दिव्यांग कल्याण आयुक्तांचा आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**



कथित आयएएस अधिकारी पूजा खेडकर हिच्या दिव्यांग प्रमाणपत्रामधील बोगसगिरी उजेडात आल्यानंतर महाराष्ट्रभरात चौकशी सत्र सुरू झाले आहे. दिव्यांगांसाठीच्या राखीव जागेवर नोकरी मिळविलेल्या ३५९ उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. तसा आदेश दिव्यांग कल्याण आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे.

यासंदर्भात 'दिव्यांग कल्याण मंत्रालय दिव्यांगांच्या दारी' अभियानाचे अध्यक्ष आमदार बच्चू कडू यांनी शासनाकडे चौकशीची मागणी केली होती. राज्यभरातील कथित बोगस दिव्यांग कर्मचाऱ्यांची यादी त्यांनी शासनाला दिली असून, त्यामध्ये सांगली, कोल्हापूर, सातारा जिल्ह्यांतील काही कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. बोगस उमेदवारांमुळे दिव्यांगांवर अन्याय होत असून, ते नोकरीपासून वंचित राहत आहेत, त्यामुळे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या धर्तीवर दिव्यांग प्रमाणपत्र पडताळणीसाठी मध्यवर्ती समिती स्थापन करण्याची मागणी कडू यांनी केली आहे.

कडू यांनी १९ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत बोगस दिव्यांग प्रमाणपत्र शोध अभियान राबविले होते, त्यातून शासकीय व निमशासकीय विभागांत ३५९ बोगस उमेदवार आढळले आहेत. ही यादी त्यांनी दिव्यांग कल्याण आयुक्तालयाकडे दिली. त्यानुसार आयुक्तांनी यादीतील दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्राच्या चौकशीचा आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे.

**साताऱ्यात १२, कोल्हापुरात आठ संशयित प्रमाणपत्रे**

बच्चू कडू यांनी दिव्यांग कल्याण आयुक्तालयाला सादर केलेल्या यादीनुसार सातारा जिल्ह्यात १२, कोल्हापूर जिल्ह्यात आठ व सांगली जिल्ह्यात पाच दिव्यांग शासकीय व निमशासकीय सेवेत आहेत. त्यांची दिव्यांगत्वाची प्रमाणपत्रे बोगस असल्याचा संशय आहे. कृषी, महसूल, उपप्रादेशिक परिवहन, आदी विभागांत ते कार्यरत आहेत.

# जुन्या पेन्शनचा मुद्दा ऐरणीवर, शासकीय कर्मचाऱ्यांचा एल्गार

## पेन्शन राज्य अधिवेशनात आवाज बुलंद : महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती :**

राज्यात १ नोव्हेंबर २००५ रोजी त्यानंतर शासन नोकरीत लागलेल्या अधिकारी व कर्मचारी यांना जुनी पेन्शन लागू करावी, अशी विविध संघटनांची मागणी आहे. जो पक्ष ही मागणी मान्य करेल त्यालाच मतदान अशी भूमिका आता संघटनांनी घेतली आहे. यासाठी १५ सप्टेंबरच्या शिर्डी येथील पेन्शन राज्य संमेलनात आवाज बुलंद करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन संघटना सतत जुन्या पेन्शनच्या मागणीसाठी विविध आंदोलन राज्यभर करीत आहे. मात्र, सरकार जुनी पेन्शन न देता डीसीपीएस, एनपीएस, आता केंद्र सरकारची यूपीएस व राज्याची सुधारित राष्ट्रीय पेन्शन योजना जीपीएस आदी योजना आणत आहे. मात्र, या सर्व योजना कर्मचारी यांच्या भविष्याच्या हिताच्या नसून फक्त काहींच्या फायद्याच्या असल्याचा आरोप संघटनेद्वारा करण्यात आला.




कर्मचारी व अधिकारी यांनी यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन जिल्हाध्यक्ष गौरव काळे, अतुल कडू, कुंदन ठाकूर, योगेश पखाले, कासीम जमादार, आशिष ढवळे, संचिता गोगटे, प्रवीण निंभोरकर, पवन साबळे, प्रज्वल घोम, रितेश जगताप, यश बहिरम, सुधीर बहादे, स्वप्नील देशमुख, भावना राऊत, प्राजक्ता राऊत, प्रिया पळसकर, योगिता वाकोडे, रूपाली झोड, प्रीती दिवाण आदींनी केले आहे.

**राजकीय पक्षाच्या नेतृत्वाने जाहीर करावी भूमिका**

या सर्व योजना व सरकारचा वेळकाढूपणा लक्षात घेऊन सर्व राजकीय पक्षाच्या नेतृत्वाने या अधिवेशनात त्यांची भूमिका सदर ठिकाणी जाहीर करावी, असे आवाहन संघटनेद्वारा करण्यात आले. अधिवेशनात किमान चार लाख अधिकारी, कर्मचारी उपस्थित राहणार असल्याचे संघटनेचे राज्य उपाध्यक्ष नामदेव मेटांगे यांनी सांगितले.

**अधिवेशनात ही राहणार प्रमुख मागणी**

१ नोव्हेंबर २००५ रोजी व त्यानंतर लागलेल्या सर्व कर्मचारी व अधिकारी यांना महाराष्ट्र नागरी सेवानिवृत्त वेतन नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवानिवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण नियम १९८४ तथा भविष्य निर्वाह निधी जीपीएफसह सर्व अनुषंगिक लाभासह जुनी पेन्शन लागू करणे, ही अधिवेशनात प्रमुख मागणी राहणार आहे.

# जिल्हा बँक प्रकाश काळबांडे अपात्रता प्रकरण : सुनावणी आटोपली, निर्णयाकडे लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रकाश काळबांडे यांना विभागीय सहनिबंधकाकडून अपात्रेची नोटीस बजाविण्यात आली आहे. यावर ११ सप्टेंबर रोजी सुनावणी घेत त्यांची बाजू ऐकण्यात आली आहे. परंतु निर्णय राखुन ठेवला असुन पुढील आठवड्यात मंगळवार किवा बुधवारी यावर निर्णय देण्याची शक्यतावर्तविली जात आहे. त्यामुळे नेमका निर्णय काय लागतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. जिल्हा मध्यवती बँकेचे संचालक प्रकाश काळबांडे यांचे सेवानिवृत्तीमुळे सहकार महर्षी बापुसाहेब काळबांडे शालेयकर्मचारी सहकारी पतसंस्थेचे सदस्यत्व एका तक्रारीमुळे गेले आहे. त्यामुळे त्यांना जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालक पदावरून अपात्रठरविण्याची मागणी तकारीव्दारे बँकेचे संचालक आनंद काळे केली होती. या तक्रारीची चौकशी करीत विभागीय सहनिबंधक यांनी काळबांडे यांना



बँकचे संचालक म्हणुन आपणास अपात्र घोषित का करू नये अशी नोटिस बजावली होती. लेखी खुलासाकरितात्यांना १५ दिवसांचा अवधीदेत प्रत्यक्ष तोंडी म्हणणे मांडायचे असल्यास १३ ऑगस्ट रोजी कार्यालयत हजर राहण्याबाबत कळविले होते. परंतु प्रकाश काळबांडे यांनी त्यांचे उत्तर सादर करण्याकरीता सात दिवसांची म्हणजे २० ऑगस्ट पर्यंतची मुदतवाढ मागितली होती. दरम्यान त्यांना पुन्हा ५ सप्टेंबर व त्यानंतर ११सप्टेंबरची तारीख दिली. ११ ला यावर अंतिम सुनावणी आटोपल्याचा दावा याविभागाकडुन करण्यात आला आहे. परंतु सलगच्या सुट्टींमुळे या प्रकरणाचा निर्णय रखडला असुन पुढील आठवड्यात प्रकाश काळबांडे यांच्या अपात्रेबाबत निर्णय देण्यात येणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. त्यामुळे या निर्णयाकडे आता सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे.

# शेतमालावरील आयात निर्यात शुल्कात बदल : अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांचा जल्लोष

## प्रधानमंत्री मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मानले आभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

केंद्र सरकारने शेतमालावरील आयात निर्यात शुल्कात बदल करण्याचा क्रांतिकारी आणि ऐतिहासिक निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण आहे. भाजप नेते तथा राज्यसभेचे खासदार अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात शेकडो शेतकऱ्यांनी अमरावतीच्या चांदुररेल्वे मार्गावर मोठा जल्लोष साजरा केला.



फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांचे अनिल बोंडेसह शेतकऱ्यांनी आभार मानले. केंद्र सरकारने खाद्यपदार्थांवरील आयात निर्यात शुल्कात बदल केल्यामुळे महाराष्ट्रातील त्यातल्या त्यात विदर्भातील सोयाबीन, कापूस, कांदा, बासमती तांदूळ उत्पादक शेतकऱ्यांना या निर्णयामुळे विशेष लाभ मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी मोदी सरकारने घेतलेला हा ऐतिहासिक व क्रांतिकारी निर्णय आहे, असे अनिल बोंडे यांनी स्पष्ट करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांचे आभार मानण्यात आले.

**ऐतिहासिक, क्रांतिकारी निर्णय : डॉ. अनिल बोंडे**

विदर्भात शेतकरी मोठ्या प्रमाणात सोयाबीन, कापूस, कांदा इत्यादी पिकांचे उत्पन्न घेतो. केंद्राने खाद्यपदार्थांवरील आयात निर्यात शुल्कात बदल केल्यामुळे शेतकऱ्यांना या निर्णयाचा थेट मोठा फायदा होणार आहे. केंद्र सरकारने हा ऐतिहासिक व क्रांतिकारी निर्णय घेतल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. हजारो शेतकऱ्यांकडून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानत असल्याची माहिती माजी कृषिमंत्री तथा खासदार डॉ.अनिल बोंडे यांनी यावेळी दिली.

# बावनकुळे म्हणतात..... महायुतीमधील जागावाटपाचा ७५ टक्के तिढा सुटला; निवडून येणाऱ्यालाच उमेदवारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अकोला**

येत्या विधानसभा निवडणुकीसाठी जागा वाटपावरून महायुतीमध्ये योग्य समन्वय असून, भाजपकडून ७५ टक्के जागांचा तिढा सोडविण्यात आला आहे. निवडून येणाऱ्या उमेदवारांनाच तिकीट दिले जाईल, असे भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी येथे पत्रकारांशी बोलताना सांगितले.

लोकसभा निवडणुकीत भाजपला बहुमत मिळाल्यास संविधान बदलले जाणार असल्याचा अपप्रचार महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला. त्यामुळे राज्यात १२ ते १३ जागांवर भाजपचे उमेदवार अतिशय कमी फरकाने पराभूत झाले. दुसरीकडे, राहुल गांधी परदेशात जाऊन आरक्षण संपविण्याची भाषा करत असल्यामुळे काँग्रेसचा आरक्षणविरोधी चेहरा समोर आल्याची टीका बावनकुळे यांनी केली.